पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / प्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ५० वा | मंगळवार, दि. ०८ सप्टेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# MPSCच्या भ्रष्ट कारभाराविरोधात विद्यार्थ्यांचा एल्गार; सरकारला घेरले !

## पेपरफुटीने पेटला संताप ! MPSC विरोधात विद्यार्थ्यांचा पुण्यात 'आक्रोश'

**पुणे (कटूसत्य वृत्त) :-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षांमधील कथित गैरप्रकार, पेपरफुटी, परीक्षांच्या निकालांबाबत उपस्थित होणारे प्रश्न आणि परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव या मुद्द्यांवरून राज्यातील स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांचा संताप सोमवारी पुण्याच्या रस्त्यावर पाहायला मिळाला. राज्यभरातून आलेल्या विद्यार्थ्यांनी ओंकारेश्वर मंदिर चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा 'विद्यार्थी आक्रोश मोर्चा' काढत सरकार आणि MPSC प्रशासनाचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांना विरोधी पक्षांनीही पाठिंबा दिला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्यासह अन्य नेते मोर्चात सहभागी झाले.

MPSCच्या परीक्षांमध्ये सातत्याने कथित गैरप्रकार समोर येत असल्याने लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. वर्षानुवर्षे अभ्यास करून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत असेल, तर या परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास कसा टिकणार, असा संतप्त सवाल विद्यार्थ्यांनी उपस्थित केला. 'आज नाही लढलो, तर कधीच जिंकणार नाही' असा निर्धार व्यक्त करत विद्यार्थ्यांनी आयोगाच्या कारभारात पारदर्शकता आणण्याची मागणी केली.









### अध्यक्ष, सचिवांच्या राजीनाम्याची मागणी

MPSCचे अध्यक्ष आणि सचिव यांचा राजीनामा घेऊन त्यांच्या जागी स्वच्छ प्रतिमेच्या अधिकाऱ्यांची तातडीने नियुक्ती करावी, अशी प्रमुख मागणी विद्यार्थ्यांनी केली. गट-ब परीक्षेबाबत उमेदवारांनी उपस्थित केलेल्या आक्षेपांवर आठ दिवसांच्या आत आयोगाने स्पष्ट भूमिका मांडावी, तसेच परीक्षांमधील कथित गैरप्रकारांची सखोल चौकशी करावी, अशी मागणीही करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या मते, परीक्षा घेणाऱ्या यंत्रणेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यास संपूर्ण निवड प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत होतो. त्यामुळे केवळ एखाद्या प्रकरणाची चौकशी न करता आयोगाच्या एकूण परीक्षा प्रक्रियेचे स्वतंत्र आणि निष्पक्ष परीक्षण करण्याची आवश्यकता आहे.

### पेपर तपासणीतील चुकांची चौकशी करा

राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ तसेच कृषिसेवा परीक्षेतील वर्णनात्मक पेपरच्या तपासणीदरम्यान झालेल्या कथित चुकांची चौकशी करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली. मुंबई क्राईम ब्रँचकडून MPSCला देण्यात आलेला प्राथमिक चौकशी अहवाल सार्वजनिक करावा, अशी मागणीही मोर्चाच्या माध्यमातून करण्यात आली.

परीक्षेतील प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते छपाई, वितरण, परीक्षा केंद्रांवरील व्यवस्था, उत्तरपत्रिका तपासणी आणि अंतिम निकालापर्यंत प्रत्येक टप्प्यावर पारदर्शक यंत्रणा उभी करावी, अशी भूमिका विद्यार्थ्यांनी मांडली.

### आरोपी अधिकाऱ्याच्या कार्यकाळातील परीक्षांचे फॉरेन्सिक ऑडिट

पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या अवर सचिव अभिजीत लेंडवे यांच्या कार्यकाळात झालेल्या सर्व परीक्षांचे फॉरेन्सिक ऑडिट करावे, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे. लेंडवे यांच्यासह मराठे आणि नखाते या प्रकरणातील आरोपींच्या सेवाकाळाची, पदोन्नतीची प्रक्रिया आणि त्यासाठी लागू करण्यात आलेल्या निकषांचीही सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली.

या आरोपींच्या संपर्कातून निवड झालेल्या उमेदवारांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (CDR) तपासावेत, तसेच प्रविण पाटील आणि मयुर टाकरे यांच्याव्यतिरिक्त अन्य एजंट्सचा या प्रकरणात सहभाग आहे का, याचाही तपास करावा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली.

### संशयास्पद निकालांचीही चौकशी करा

एका परीक्षेपुरती चौकशी मर्यादित न ठेवता अन्य परीक्षांच्या निकालांबाबत विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या शंकांचीही चौकशी करावी, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी केली. विशेषतः 'DI'मधील संशयास्पद निकाल आणि उत्तीर्ण उमेदवारांचे फॉरेन्सिक ऑडिट करावे, अशी भूमिका विद्यार्थ्यांनी घेतली.

याशिवाय २५ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रस्तावित गट-क पूर्व परीक्षा पूर्णपणे पारदर्शक वातावरणात घेण्यात यावी, परीक्षेच्या प्रत्येक टप्प्यावर सुरक्षा व्यवस्था कडक करावी आणि विद्यार्थ्यांचा आयोगावरील विश्वास पुन्हा निर्माण करावा, अशी मागणी करण्यात आली. लघुलेखक अर्थात 'Stenographer' पद निर्माण करण्याची मागणीही विद्यार्थ्यांनी केली.

### 'भ्रष्टाचार होत असेल तर प्रश्न विचारायचे नाहीत का ?'

मोर्चाला पाठिंबा देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि ठाकरे गटाच्या शिवसेनेसह विरोधी पक्षांचे नेते सहभागी झाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे तसेच आमदार रोहित पवार यांनीही विद्यार्थ्यांसोबत रस्त्यावर उतरून आंदोलनाला पाठिंबा दिला.

यावेळी रोहित पवार यांनी सरकारवर निशाणा साधत, 'विद्यार्थ्यांचं भविष्य घडवणाऱ्या परीक्षेत भ्रष्टाचार होत असेल तर प्रश्न विचारायचे नाहीत का ? यात राजकारण कुठून आलं ?' असा संतप्त सवाल उपस्थित केला.

विद्यार्थ्यांच्या मागण्या या राजकीय नसून त्यांच्या आयुष्याशी आणि भवितव्याशी संबंधित आहेत. विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यात राजकारण शोधण्यापेक्षा सरकारने त्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून न्याय द्यावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

### 'MPSCच्या शुद्धीकरणाशिवाय लढा थांबणार नाही'

'MPSCच्या शुद्धीकरणाशिवाय हा लढा थांबणार नाही. आजचा आक्रोश हा विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. या मोर्चात कोणतेही राजकारण नाही, समाजकारण आहे.' असे रोहित पवार यांनी सांगितले.

आयोगाच्या अध्यक्षांवर भ्रष्टाचाराचे आरोप होत असतील, तर त्याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. तक्रारी दाखल होत असताना त्यावर चौकशी आणि कारवाई का होत नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांना बाजूला करून परीक्षा व्यवस्था स्वच्छ करावी, अशी विद्यार्थ्यांची मागणी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### 'आयोगाने पेपर विकायचे आणि विद्यार्थ्यांनी अभ्यास करायचा ?'

MPSCच्या उत्पादन शुल्क (विभागीय) परीक्षेतील मार्किंग पॅटर्न लीक प्रकरणाचा संदर्भ देत रोहित पवार यांनी आयोगाच्या कार्यपद्धतीवरही तीव्र टीका केली. या प्रकरणात आयोगातील सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यावर आरोप झाल्याचे सांगत त्यांनी हा प्रकार अत्यंत गंभीर असल्याचे म्हटले.

'विद्यार्थ्यांनी रात्रंदिवस अभ्यास करायचा आणि दुसरीकडे पेपर लीक होण्याचे प्रकार घडायचे, हे बिलकूल खपवून घेतले जाणार नाही,ह्व अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेतली. MPSCमध्ये आवश्यक ते शुद्धीकरण होईपर्यंत विद्यार्थ्यांचा हा लढा सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

### सरकारच्या भूमिकेकडे लक्ष

स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी अनेक वर्षे आपले शिक्षण, रोजगार आणि वैयक्तिक आयुष्य बाजूला ठेवून परीक्षांच्या तयारीला वाहून घेतात. त्यामुळे परीक्षेतील एकही गैरप्रकार त्यांच्या संपूर्ण भवितव्यावर परिणाम करू शकतो. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची तातडीने आणि निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

आता या आक्रोश मोर्चानंतर MPSC प्रशासन आणि राज्य सरकार विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर काय भूमिका घेतात, कथित पेपरफुटी व अन्य गैरप्रकारांच्या चौकशीबाबत कोणते निर्णय घेतात आणि आगामी गट-क पूर्व परीक्षा किती पारदर्शकपणे घेतली जाते, याकडे राज्यातील लाखो स्पर्धा परीक्षा उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

## लोडशेडिंगविरोधात खा. प्रणिती शिंदे आक्रमक

### महावितरणच्या कार्यालयात केला ठिय्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात सध्या मोठ्या प्रमाणात लोडशेडिंग सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक गावे अंधारात गेली आहे. ही लोडशेडिंग नेमकी रात्रीच्या वेळी करण्यात येत असल्याने गावकऱ्यांना अंधारातच रात्र काढावी लागत आहे.

महावितरणला वीज निर्मितीसाठी भारत इलेक्ट्रीसिटी पॉवरिंग इंडिया अवार्ड 2026 मध्ये स्टेट जनरेशन कंपनी ऑफ द इयर हा पुरस्कार मिळाला असला तरी कंपनीला मागणीच्या तुलनेत विजेचा परवठा करण्यात तारेवरची करावी लागत आहे. त्यामुळे राज्यातील अनेक ग्रामीण भागात लोडशेडिंग सुरू करण्यात आली आहे. मात्र, या लोडशेडिंगविरोधात आता सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे आक्रमक झाल्या आहेत. या लोडशेडिंगला विरोध करत आज सोमवारी (7 सप्टेंबर) खासदार प्रणिती शिंदे यांनी थेट एमएसईबीच्या कार्यालयात जाऊन त्या ठिकाणी ठिय्या आंदोलन केले. एमएसईबीचे सुनील माने यांच्या कार्यालयातच खासदार शिंदेंनी ठिय्या आंदोलन केले.

सोलापुरातील काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे या आज लोडशेडिंगविरोधात चांगल्याच आक्रमक झाल्याच्या पाहायला मिळाल्या. शेकडो शेतकऱ्यांना सोबत घेत त्यांनी सोलापूरच्या महावितरणच्या मुख्य अभियंता कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. करपलेल्या सोयाबीनची रोपं हातात घेऊन प्रणिती शिंदे महावितरण कार्यालयात दाखल झाल्या. पावसाअभावी खरीप पिकं संकटात असताना लोडशेडिंगमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी आणखी वाढल्याचा आरोप करण्यात आला. पाणी उपलब्ध असूनही वीजपुरवठा खंडित होत असल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. तूर, सोयाबीन, सूर्यफूल आणि उडदाच्या पिकांवर संकट ओढवल्याचे आंदोलकांनी सांगितले. तब्बल दोन तास महावितरणच्या अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्या दालनात ठिय्या देत लोडशेडिंग तत्काळ बंद करण्याची मागणी करण्यात आली. लेखी आश्वासनानंतर प्रणिती शिंदे यांनी आंदोलन स्थगित केले.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्या म्हणाल्या की, संध्याकाळी ज्यावेळी लोडशेडिंग नसायला पाहिजे,



त्यावेळी लोडशेडिंग असते. कारण, तेव्हा स्वयंपाकाची अभ्यासाची वेळ असते आणि तेव्हाच लाईट नसते. म्हणून आम्ही प्रामुख्याने हीच मागणी केली की, लोडशेडिंगची वेळ आम्हाला मान्य नसून ती बदलायला पाहिजे. या लोकांनी ठरवले आहे की शेतकऱ्याचा छळ करायचा आहे. महाराष्ट्रात पहिले आंदोलन हे विद्यार्थ्यांच्या माध्यमातून झाले. आता दुसरे आंदोलन शेतकऱ्यांच्या माध्यमातून व्हायला वेळ नाही लागणार आणि ते सांगतात की संपूर्ण महाराष्ट्रात ब्लॅक आऊट करायची वेळ येईल. यांना जर का शेतकऱ्यांचा अंतच पाहायचा आहे मग अशा स्लो पॉयजन पद्धतीने का करत आहेत ? हे काय चाललंय ? एक तर दुष्काळ वरून लोड शेडिंग आणि म्हणून आज आम्ही जोपर्यंत लेखी आश्वासन दिले गेले नाही तोपर्यंत ठिय्या आंदोलन केले, असे खासदार प्रणिती शिंदेंनी सांगितले.

## पोळा सणावर दुष्काळाचे सावट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बैलपोळा सण चार दिवसांवर आला आहे. मात्र, यंदा राज्यातील बहुतांश भागांत अद्याप पुरेसा पाऊस झालेला नाही. खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून, रब्बीच्या पेरण्या होतील की नाही, याचीही शाश्वती नाही.

या पार्श्वभूमीवर गुरुवारी (ता. १०) साजऱ्या होणाऱ्या श्रावणी बैलपोळा सणावर दुष्काळाचे सावट गडद झाले आहे.



शेतकरी बैलपोळ्यानिमित्त बैल सजावटीचे साहित्य तसेच अन्य वस्तूंची खरेदी करतात. मात्र, यंदा या खरेदीसाठी शेतकऱ्यांचा उत्साह कमी झाल्याचे दिसत आहे. शेतकऱ्यांसाठी वर्षभरातील सणांमध्ये श्रावणी पोळा हा महत्त्वाचा सण मानला जातो.

या दिवशी बैल सजावटीच्या साहित्यासह अन्य वस्तूंची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जाते. शेतीची तसेच पाऊस-पाण्याची स्थिती चांगली असल्यास पोळा सणाचा उत्साह अधिक असतो. यंदा मात्र पावसाअभावी शेती अडचणीत आली आहे.

राज्यातील डोंगरपट्ट्यात चांगला पाऊस झाल्याने त्यावर अवलंबून असलेली उजनी, जायकवाडी, कोयना यांसह मोठी धरणे भरली आहेत. मात्र, घाटमाथा वगळता अन्य भागांत यंदा अद्याप पुरेसा पाऊस झालेला नाही. प्रामुख्याने अहिल्यानगर, संपूर्ण मराठवाडा, सोलापूर, विदर्भातील काही जिल्हे तसेच सातारा, सांगली, कोल्हापूर आणि नाशिक जिल्ह्यांतील काही भागांत पावसाची प्रतीक्षा आहे. अनेक भागांत पाऊस तुरळक झाला असून अद्याप पाणी वाहिलेही नाही.

महिनाभरापासून पाऊस पूर्णतः गायब असल्याने दुष्काळी पट्ट्यातील सोयाबीन, मूग, तूर, उडीद आणि कापसाची पिके अडचणीत आली आहेत. काही भागांत ७० ते ८० टक्के पिके वाया गेल्यात जमा आहेत.

पावसाअभावी खरीप पिकांची झालेली दुरवस्था आणि शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी याचा थेट परिणाम पोळ्याच्या खरेदीवर झाला आहे. पोळ्यानिमित्त बाजारात शेळी, दुभती जनावरे, बैल, म्हशी यांच्यासह भाजीपाला, आडत आणि जीवनावश्यक वस्तूंची दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली जातात. त्यामुळे नेहमी गजबजणारा बाजार यंदा पोळा सणाच्या तोंडावर तुलनेने ओस पडल्याचे चित्र आहे.

## बार्शीला ५ टीएमसी पाण्याची शिफारस

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त पाणी भीमा खोऱ्यात वळविणाऱ्या तब्बल १७ हजार कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी योजनेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिरवा कंदील दाखवला आहे. या योजनेच्या सर्वेक्षणाचे काम प्रत्यक्षात सुरू झाले असून, या योजनेतून सोलापूर जिल्ह्यासह दुष्काळग्रस्त मराठवाड्याला मोठा दिलासा मिळणार आहे.

पाणीवाटपात कमी वाटा मिळालेल्या बार्शी तालुक्यासाठी या योजनेतून ५ टीएमसी पाण्याची शिफारस करण्यात आल्याची महत्त्वपूर्ण माहिती कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत धुमाळ यांनी दिली.

बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आमदार राजेंद्र राऊत, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, बाजार समितीचे सभापती विजय गरड आदी उपस्थित होते. डॉ. धुमाळ म्हणाले, कृष्णा-भीमा स्थिरीकरण योजनेंतर्गत हे पाणी आणले जाणार आहे. या योजनेतून सोलापूर जिल्ह्याला ४० ते ५० टीएमसी तर मराठवाड्याला सुमारे १५ टीएमसी पाणी मिळण्याची शक्यता आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून बार्शी तालुका पाण्यापासून वंचित राहिला आहे. त्यामुळे या योजनेत बाशीर्साठी



स्वतंत्र ५ टीएमसी पाण्याची तरतूद करण्याची शिफारस शासनाकडे केली आहे. या पाण्यामुळे बार्शी तालुक्याचा पिण्याच्या पाण्यासह शेतीचा प्रश्न कायमस्वरूपी सुटण्यास मदत होईल. दरम्यान, गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित असलेल्या बार्शी उपसा सिंचन योजनेचे ८० टक्के काम पूर्ण झाले असून या योजनेलाही आता गती मिळाली आहे.

तावडी तलावात पाणी सोडण्यासाठी निधीअभावी आणि सुधारित प्रशासकीय मान्यतेमुळे रखडलेले काम आता मार्गी लागले आहे. निधीची अडचण दूर झाली असून पुढील आठवड्यात संबंधित ठेकेदारांना निधी वितरित करून काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.योजनेच्या टप्पा-३ अंतर्गत पिंपळगाव ढाळे धरणात पाणी सोडण्याच्या कामात काही तांत्रिक अडथळे होते, ते दूर करण्यासाठी लवकरच मंत्रिस्तरीय बैठक घेण्यात येणार असल्याचेही डॉ. धुमाळ यांनी सांगितले.

## 'एन.सी.एम.सी.' कार्ड सक्तीच्या गदारोळानंतर एस.टी.चा प्रवाशांना दिलासा; तात्पुरती शिथिलता घोषित !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यशासनाच्या 'लाडकी बहीण' योजना आणि विविध सवलतीअंतर्गत एस.टी.ने प्रवास करणाया महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी 'एन.सी.एम.सी. कार्ड' (राष्ट्रीय सामासिक प्रवास कार्ड) १ सप्टेंबरपासून अनिवार्य केल्यामुळे पहिल्याच दिवशी राज्यभरात मोठा गदारोळ उडाला होता.

कार्ड नसल्याने आणि सर्व्हर डाऊन असल्यामुळे अनेक महिला अन वृद्ध यांना पूर्ण तिकीट काढावे लागल्याच्या तक्रारी समोर आल्या. एस.टी. महामंडळाने तातडीने पावले उचलत सक्तीच्या नियमांमध्ये तात्पुरती शिथिलता घोषित केली आहे. सांगली-पुणे, कोल्हापूर-सोलापूर, तुळजापूर आणि कोकणातून येर्णाया एस.टी. बसगाड्यांमध्ये 'एन.सी.एम.सी. कार्ड' नसलेल्या स्त्रियांनी आधारकार्ड दाखवले, तरी वाहकांनी ५० टक्के सवलत देण्यास नकार देऊन पूर्ण तिकिटाचे पैसे घेतल्याने स्त्री प्रवाशांतून अप्रसन्नतेचा सूर उमटत आहे. यावरून बऱ्याच ठिकाणी प्रवासी आणि वाहक यांच्यात वादाचे प्रसंगही घडत आहेत.

'एन.सी.एम.सी' कार्ड नसेल, तर आम्हाला आधारकार्डवर स्त्रियांना ५० टक्के सवलत द्यावी', असे सांगण्यात आलेले नाही. शासनाचा



तसा अध्यादेशही निघाला नाही', असे वाहकांकडून सांगण्यात येत आहे. डिजिटल आणि आधुनिक तिकीट व्यवस्थेकडे वाटचाल करतांना आवश्यक तांत्रिक सिद्धता, पुरेशी कार्ड उपलब्धता आणि योग्य जनजागृती न झाल्यामुळे प्रवाशांना पहिल्याच टप्प्यात नाहक मनस्ताप सहन करावा लागला आहे. याविषयी सांगली बसस्थानक प्रमुख श्री. महेश पाटील यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी 'ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवासी यांना सवलतीच्या शुल्कात तिकिटे मिळण्यासाठी राज्यशासनाने महत्त्वाच्या सूचनांचा अध्यादेश लागू केला आहे. त्यानुसार प्रवाशांना तिकिटात सवलत देण्यात येईल', असे स्पष्ट केले.

**१. ऑनलाईन आरक्षण** – ज्या महिला आणि ज्येष्ठ नागरिक यांनी प्रवासाचे तिकीट आधीच ऑनलाईन आरक्षित केले आहे, त्यांना एक वेळची विशेष गोष्ट म्हणून 'एन.सी.एम.सी. कार्ड' अनिवार्य न करता सवलतीच्या शुल्कात प्रवास करण्यास अनुमती देण्यात आली आहे.

**२. नोंदणी पावती ग्राह्य** – ज्यांनी 'एन.सी.एम.सी कार्ड'साठी नोंदणी केली आहे; पण प्रत्यक्ष कार्ड मिळालेले नाही, त्यांना नोंदणीची पावती दाखवून ३० सप्टेंबरपर्यंत सवलतीच्या तिकिटावर प्रवास करण्याची मुभा देण्यात आली आहे.

**३. 'एस.टी. संगे तीर्थाटन'**– या योजनेअंतर्गत प्रवास करणाया नागरिकांसाठी १२ सप्टेंबरपर्यंत जुनी सवलत पद्धत कायम ठेवण्यात आली आहे.

**४. गणेशोत्सव गट आरक्षण**– गणेशोत्सवाच्या काळात केलेल्या गट आरक्षणासाठी 'एन.सी.एम.सी कार्ड'ची सक्ती असणार नाही. ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवासी यांना त्यांच्या आरक्षित तिकिटावर सवलत लागू करण्यात आली आहे.

**५. कागदी तिकिटे वैध** – आगारांमधील सर्व्हरवरील ताण आणि तांत्रिक अडचणी पहाता १४ सप्टेंबरपर्यंत कागदी स्वरूपातील सवलतीची तिकिटे वैध मानली जातील.

६.सक्रीय कार्डधारकांसाठी प्रक्रिया चालू – ज्या प्रवाशांकडे आधीपासूनच सक्रीय 'एन.सी.एम.सी. कार्ड' आहे, त्यांना कार्डच्या माध्यमातून सवलतीचे तिकीट देण्याची प्रक्रिया चालूच रहाणार आहे.

## सोलापूरात थकीत ऊस बिलांसाठी शेतकऱ्यांचा उद्रेक

### गोकुळ शुगरविरोधात झाडावर चढून आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गोकुळ शुगरकडून थकीत ऊस बिलांची रक्कम मिळत नसल्याचा आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी सोलापुरात झाडावर चढून आंदोलन केले. थकीत बिलांची रक्कम मिळेपर्यंत झाडावरून खाली उतरणार नाही, अशी आक्रमक भूमिका आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी घेतल्याने प्रशासनाची धावपळ उडाली.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, सन 2023 ते 2025 या कालावधीतील सुमारे 270 शेतकऱ्यांची 1 कोटी 97 लाख रुपयांची ऊस बिलांची थकबाकी असल्याचा दावा करण्यात आला आहे. या थकीत रकमेबाबत साखर आयुक्तालय आणि जिल्हा प्रशासनाकडे वारंवार दाद मागूनही ठोस कार्यवाही झाली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला.

### 'लेखी आश्वासनाशिवाय आंदोलन मागे घेणार नाही'

"कारखान्याने आमचा ऊस नेला, साखर विकली; मात्र शेतकऱ्यांचे पैसे वर्षानुवर्षे अडकवून ठेवले आहेत. बँकांचे कर्ज, मुलांचे शिक्षण आणि संसाराचा खर्च भागवणे कठीण झाले आहे. संबंधितांवर कायदेशीर कारवाई करून शेतकऱ्यांची थकीत





रक्कम खात्यावर जमा करावी," अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

थकीत बिलांबाबत ठोस लेखी आश्वासन आणि कायदेशीर कारवाईची हमी मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला.

### प्रशासनाकडून आंदोलन थांबवण्याचे प्रयत्न

शेतकरी झाडावर चढल्याची माहिती मिळताच पोलीस प्रशासन आणि महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. तहसीलदार किरण जमदाडे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनीही शेतकऱ्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला; मात्र ठोस लेखी आश्वासनाशिवाय आंदोलन मागे घेण्यास शेतकऱ्यांनी नकार दिला.

या आंदोलनात ॲड. अमोल पाटील (वागदरी), अरविंद घोडके (अणदूर), हनुमंत बिराजदार, भीमाशंकर आलुरे, काशिनाथ माने, अभिजीत सावळी, मल्लिनाथ शीलवंत, शरणाप्पा नागूर यांच्यासह अन्य शेतकरी सहभागी झाले होते.

थकीत ऊस बिलांच्या प्रश्नावरून झालेल्या या आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. दरम्यान, या मागणीला जिल्ह्यातील इतर शेतकरी संघटनांनीही पाठिंबा दर्शविल्याचे आंदोलनकर्त्यांकडून सांगण्यात आले.

## संपादकीय

# अर्थव्यवस्था वेगाने धावतेय; पण सामान्य माणूस कुठे?

नव्या आर्थिक वर्षातील पहिल्याच तिमाहीत एकूण देशांतर्गत उत्पादनाने (जीडीपी) नोंदवलेली ७.८ टक्के वाढ ही अर्थव्यवस्थेतील स्थैर्याची हमी आहे. विशेषतः पश्चिम आशियातील युद्धजन्य स्थिती, इंधनाचा तुटवडा–दरवाढ आणि पुरवठा साखळीतील अडचणी आदींमुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्था हेलकावे खात असताना भारताने रिझर्व्ह बँक आणि अर्थतज्ज्ञांच्या अंदाजाहून अधिक वेगाने वाढ नोंदवली, हा सुखद संकेतच. देशांतर्गत मागणी आणि नागरिकांनी मोठ्या प्रमाणात केलेले खर्च, सरकारी गुंतवणुकीचा कायम राहिलेला ओघ आणि धोरणात्मक लवचीकता यांना त्याचे श्रेय जाते.

पुढील तिमाहीतही सणावारांच्या खरेदीचा अर्थव्यवस्थेला आधार मिळण्याचा अंदाज आहे; मात्र मान्सूनच्या कमी–अधिक प्रमाणाचा अन्नधान्य उत्पादन, पर्यायाने ग्रामीण अर्थव्यवस्था व महागाईवर काय परिणाम होणार, यावर लक्ष ठेवावे लागेल.

इराण–अमेरिका युद्ध आणि इंधनटंचाई सुरू झाल्यानंतर, प्रारंभी जाणवलेला इंधन व गॅसचा तुटवडा वगळता भारताला या युद्धाच्या तीव्र झळा लागलेल्या दिसत नाहीत, असे यातून ढोबळमानाने म्हणता येते. या काळात सेवा क्षेत्राने अपेक्षेप्रमाणे दहा टक्के वाढ दर्शवून यात भरीव वाटा उचलला आहे. त्यामध्ये बँकिंग, विमा, वित्त–गुंतवणूक, माहिती तंत्रज्ञान, व्यापार, हॉटेल आणि पर्यटन–वाहतूक यांची कामगिरी चांगली राहिली. उत्पादन क्षेत्राचीही वाढ ७.७ टक्के आहे. मात्र, शेती क्षेत्राच्या वाढीचा वेग केवळ ३.६ असून गेल्या वर्षी याच तिमाहीतील ४.४च्या तुलनेत तो निराशाजनक म्हणावा लागेल. विशेषतः गव्हाच्या उत्पादनात केवळ अर्ध्या टक्क्याने झालेली वाढ चिंतेचा विषय ठरू शकते. या तिमाहीत 'रिअल जीडीपी' ८१.३६ लाख कोटी रुपये होता.

अर्थतज्ज्ञांचे अंदाज सात टक्क्यांचे असताना, त्याहून झालेली वाढ अर्थव्यवस्थेतील स्थैर्य आणि विश्वासाचेही निदर्शक आहे. जीडीपीसह वस्तू व सेवाकराच्या (जीएसटी) संकलनातील पंधरा टक्के वाढही समाधानकारक आहे. सेवा आणि उत्पादन क्षेत्रातील वाढीमुळे भविष्यात रोजगारसंधी निर्माण होऊ शकतात, तर दुसरीकडे शेतीक्षेत्राची मंद वाढ, महागाई आणि युद्धस्थितीचा अर्थव्यवस्थेवर ताण येऊ शकतो, असे हे दुहेरी चित्र म्हणता येईल.

करोनाच्या साथीनंतर अनेक देशांच्या अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाल्या. भारतावरही त्याचे परिणाम झाले असले, तरी तुलनेने आपली अर्थव्यवस्था लवकर सावरली. मात्र, त्यानंतरही विविध तणावांमुळे जगभरात मंदीचे सावट आहे. त्या पार्श्वभूमीवर पहिल्या तिमाहीतील या कामगिरीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री सीतारामन यांच्यासह सरकारच्या वतीने समाधान व्यक्त करून विरोधकांवर टीकास्त्र सोडण्यात आले आहे. दुसरीकडे विरोधक 'हा विकास असेल, तर महागाई, बेरोजगारी आणि विषमता इतकी टोकाला का गेली आहे,' असा सवाल विचारत आहेत. टीकाकारांच्या मते हे आकडे भांडवली गुंतवणूक, तंत्रज्ञान उद्योगांचा नफा आणि उच्च व उच्च मध्यमवर्गाच्या उत्पन्न–खर्चामध्ये फिरणारे आहेत. या राजकीय भूमिकांच्या पलीकडे जाऊन पाहिले, तरी या आर्थिक विकासाचे लाभ तळागाळापर्यंत पोहोचवणे, हे आव्हान निरंतर राहणारे आहे, याविषयी दुमत नसावे.

गेल्या काही दिवसांमध्ये दूध, साखरेसह विविध जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईत वाढ होत आहे; त्या पार्श्वभूमीवर व्याजदरांमध्ये वाढीचा निर्णय झाला, तर त्याचा विकासदरावर परिणाम होण्याची भीती आहे. त्याशिवाय पश्चिम आशियातील तणाव अद्याप पूर्णपणे संपलेला नाही. भविष्यात इंधनाचा तुटवडा कायम राहिल्यास इंधनाची दरवाढ, वाहतूक खर्चातही वाढ आणि महागाईत भर किंवा सरकारवर अनुदानाचा मोठा बोजा पडू शकतो.

रुपयाची घसरण सुरूच असून, निर्यातीमध्येसुद्धा फारशी आशादायक कामगिरी नाही. नजिकच्या काळातही जगभरातील स्थिती सुधारण्याची शक्यता धूसर असल्याने देशांतर्गत मागणीवर विसंबून राहावे लागणार आहे. त्यासाठी दरडोई उत्पन्न वाढून बाजारपेठ विस्तारणे आणि मागणीत वाढ महत्त्वाची ठरेल. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) माहिती तंत्रज्ञान क्षेत्रावर कर्मचारी कपातीचे ढग घोंगावत असून सेवा क्षेत्राची कामगिरी टिकवण्याचे मोठे आव्हान असेल. त्याबरोबरच पायाभूत सुविधांमध्ये होणारी गुंतवणूक प्रामुख्याने सरकारी आहे. भविष्यकाळात खासगी गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अथक प्रयत्न करण्याचा संदेशही या आकड्यांनी दिला आहे.

# साक्षरता : विकासाच्या प्रत्येक दाराची किल्ली

माणसाच्या हातात लेखणी आली आणि त्याने आपल्या अनुभवांना शब्दबद्ध करण्यास सुरुवात केली, तेव्हापासून मानवी संस्कृतीच्या विकासाला नवी दिशा मिळाली. पिढ्यानपिढ्या मिळविलेले ज्ञान जतन करणे, अनुभवांची देवाणघेवाण करणे, विचार व्यक्त करणे आणि पुढील पिढीला ज्ञान हस्तांतरित करणे यासाठी अक्षरांचे सामर्थ्य मानवाने ओळखले. म्हणूनच साक्षरता ही केवळ वाचता–लिहिता येण्याची क्षमता नसून मानवी सभ्यतेच्या प्रगतीचा पाया आहे. अक्षरज्ञानामुळे माणूस माहितीच्या जगाशी जोडला जातो; परंतु माहितीचे आकलन, तिचे परीक्षण, योग्य निर्णयक्षमता आणि ज्ञानाचा जीवनात उपयोग करण्याची क्षमता विकसित झाली की साक्षरतेला खरा अर्थ प्राप्त होतो. ८ सप्टेंबर रोजी साजरा केला जाणारा जागतिक साक्षरता दिन याच व्यापक जाणिवेचा जागतिक संदेश देतो. प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाची समान संधी मिळावी, निरक्षरतेमुळे निर्माण होणारे सामाजिक आणि आर्थिक अडथळे दूर व्हावेत आणि ज्ञानाच्या माध्यमातून व्यक्ती अधिक स्वावलंबी, सजग व सक्षम व्हावी, हा या दिनाचा मूलभूत हेतू आहे.

जागतिक साक्षरता दिनाची संकल्पना साक्षरतेला मानवी विकासाच्या केंद्रस्थानी आणण्याच्या प्रयत्नातून पुढे आली. ८ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन म्हणून निश्चित करण्यात आला आणि त्यानंतर जगभरात साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी विविध उपक्रम सुरू झाले. निरक्षरतेचा प्रश्न केवळ शिक्षणाच्या क्षेत्रापुरता मर्यादित नसतो. निरक्षर व्यक्तीला अनेकदा रोजगाराच्या संधींपासून, आर्थिक व्यवहारांपासून, शासकीय योजनांच्या लाभापासून आणि सामाजिक निर्णयप्रक्रियेतील सहभागापासून दूर राहावे लागते. त्यामुळे साक्षरता ही व्यक्तीच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय सक्षमीकरणाशी संबंधित आहे. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीला स्वतःच्या जीवनावर अधिक नियंत्रण मिळते आणि परावलंबित्व कमी होते. म्हणूनच साक्षरता ही मानवी प्रतिष्ठेचा आणि सामाजिक न्यायाचा महत्त्वाचा आधार मानला पाहिजे.

निरक्षर व्यक्तीच्या जीवनातील अडचणी अनेकदा आपल्या लक्षात येत नाहीत. एखाद्या शासकीय कार्यालयात अर्ज भरताना दुसऱ्याची मदत घ्यावी लागणे, बँकेत व्यवहार करताना कागदपत्रांवर काय लिहिले आहे हे समजत नसणे, औषधांच्या वापराच्या सूचना वाचता न येणे, सार्वजनिक वाहतुकीवरील सूचना समजण्यात अडचण येणे किंवा स्वतःच्या हक्कांशी संबंधित माहिती वाचता न येणे या गोष्टी व्यक्तीच्या स्वावलंबनावर मर्यादा आणतात. साक्षर झाल्यानंतर मात्र हीच व्यक्ती स्वतः माहिती वाचू शकते, प्रश्न विचारू शकते आणि स्वतःच्या निर्णयांवर विश्वास ठेवू शकते. म्हणून साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळखणे नव्हे, तर स्वतःच्या जीवनातील निर्णय स्वतः घेण्याची क्षमता विकसित करणे होय.

भारताच्या संदर्भात साक्षरतेचा प्रश्न अधिक व्यापक आहे. विविध भाषा, संस्कृती, भौगोलिक प्रदेश, सामाजिक स्तर आणि आर्थिक परिस्थिती असलेल्या भारतात शिक्षणाच्या संधी सर्वांपर्यंत समान प्रमाणात पोहोचविणे हे मोठे आव्हान राहिले आहे. स्वातंत्र्याच्या वेळी निरक्षरतेचे प्रमाण मोठे होते. ग्रामीण भाग, दुर्गम प्रदेश, महिला, आदिवासी समाज, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि सामाजिकदृष्ट्या वंचित समूह यांच्यासाठी शिक्षणाच्या संधी मर्यादित होत्या. स्वातंत्र्यानंतर शासनाने शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी अनेक योजना आणि कार्यक्रम राबविले. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, प्रौढ साक्षरता, सर्वसमावेशक शिक्षण आणि शिक्षणाच्या अधिकाराच्या माध्यमातून समाजातील अधिकाधिक घटकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रयत्नांमुळे साक्षरतेच्या क्षेत्रात प्रगती झाली असली तरी शिक्षणाची गुणवत्ता आणि समान उपलब्धता हा प्रश्न अजूनही महत्त्वाचा आहे.

साक्षरतेच्या चळवळीमध्ये महिला शिक्षणाला विशेष महत्त्व आहे. स्त्री साक्षर झाली की तिच्या जीवनातच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू होते. शिक्षित महिला आपल्या आरोग्याबाबत अधिक जागरूक असते, मुलांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहते, कुटुंबातील आर्थिक व्यवहार समजून घेते आणि सामाजिक प्रश्नांवर स्वतंत्र मत व्यक्त करण्याची क्षमता विकसित करते. शिक्षणामुळे महिलांच्या आत्मविश्वासात वाढ होते आणि निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढतो. त्यामुळे मुलींच्या शिक्षणाकडे खर्च म्हणून नव्हे, तर समाजाच्या भविष्यातील विकासासाठीची गुंतवणूक म्हणून पाहण्याची गरज आहे. एका मुलीला शिक्षण मिळाले तर तिच्या माध्यमातून पुढील पिढ्यांपर्यंत ज्ञान आणि जागरूकतेचा वारसा पोहोचू शकतो.

प्रौढ साक्षरतेचे महत्त्वही कमी नाही. बालपणी शिक्षण घेता आले नाही म्हणून व्यक्तीच्या शिकण्याच्या शक्यता संपत नाहीत. जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर शिक्षण घेण्याचा अधिकार प्रत्येकाला असला पाहिजे. अनेक प्रौढ व्यक्तींना गरिबी, रोजगार, कौटुंबिक जबाबदाऱ्या, स्थलांतर किंवा सामाजिक परिस्थितीमुळे औपचारिक शिक्षण घेता आलेले नसते. अशा व्यक्तींसाठी त्यांच्या वेळेनुसार आणि जीवनाशी संबंधित विषयांवर आधारित शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्रौढ व्यक्ती साक्षर झाली की ती शासनाच्या योजनांचा लाभ अधिक सहजपणे घेऊ शकते, आर्थिक व्यवहार समजून घेऊ शकते, मुलांच्या शिक्षणात सहभागी होऊ शकते आणि समाजातील विविध प्रक्रियांमध्ये अधिक आत्मविश्वासाने भाग घेऊ शकते. म्हणून प्रौढ साक्षरता ही समाजाच्या विकासाची महत्त्वाची गुंतवणूक आहे.

आज साक्षरतेच्या पारंपरिक संकल्पनेपलीकडे जाण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. केवळ अक्षर ओळखणे किंवा सही करणे ही साक्षरतेची अंतिम पायरी मानता येणार नाही. एखादी व्यक्ती वाचलेली माहिती समजून घेते का, तिच्या संदर्भाचा विचार करते का, योग्य–अयोग्य माहितीमधील फरक ओळखते का आणि मिळालेल्या ज्ञानाचा आपल्या जीवनात उपयोग करू शकते का, हे महत्त्वाचे आहे. म्हणून आज 'कार्यक्षम साक्षरता' ही संकल्पना अधिक महत्त्वाची



ठरते. वाचन, लेखन आणि गणित या मूलभूत कौशल्यांचा उपयोग प्रत्यक्ष जीवनातील समस्या सोडविण्यासाठी करता येणे आवश्यक आहे. साक्षरता जीवनाशी जोडली गेली तरच ती व्यक्तीच्या विकासाला खऱ्या अर्थाने गती देऊ शकते.

डिजिटल क्रांतीमुळे साक्षरतेचे स्वरूप आणखी बदलले आहे. मोबाईल दूरध्वनी, संगणक आणि इंटरनेटने माहिती मिळविण्याची प्रक्रिया अतिशय सोपी केली आहे. काही क्षणांत जगाच्या कोणत्याही भागातील माहिती आपल्या हातात येते. परंतु माहितीचा वेग वाढला तसाच चुकीच्या माहितीचा प्रसारही वाढला आहे. सामाजिक माध्यमांवर फिरणारी प्रत्येक माहिती खरी असेलच असे नाही. खोट्या बातम्या, अफवा, बनावट संदेश, दिशाभूल करणारे दावे आणि आर्थिक फसवणुकीचे प्रकार नागरिकांसमोर नवी आव्हाने निर्माण करीत आहेत. त्यामुळे डिजिटल साधनांचा वापर करता येणे पुरेसे नसून माहितीची सत्यता तपासणे, विश्वासार्ह स्रोत ओळखणे, वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवणे आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. डिजिटल साक्षरता ही आधुनिक साक्षरतेची अनिवार्य बाजू बनली आहे.

आर्थिक व्यवहारांचे वाढते डिजिटलीकरण पाहता आर्थिक साक्षरतेचे महत्त्वही वाढले आहे. बचत, बँक खाते, कर्ज, विमा, व्याज, डिजिटल व्यवहार आणि आर्थिक नियोजन याबाबत मूलभूत माहिती प्रत्येक नागरिकाला असणे आवश्यक आहे. आर्थिक अज्ञानामुळे अनेकदा व्यक्ती फसवणुकीला बळी पडते किंवा चुकीचे आर्थिक निर्णय घेते. त्यामुळे साक्षरतेचा अर्थ आर्थिक स्वावलंबनाशी जोडणे आवश्यक आहे. स्वतःच्या पैशांबाबत योग्य निर्णय घेता येणे ही व्यक्तीच्या आत्मनिर्भरतेची महत्त्वाची खूण आहे. त्याचप्रमाणे आरोग्यविषयक माहिती समजणे, औषधांच्या सूचना वाचणे, आरोग्यविषयक अफवांपासून सावध राहणे आणि योग्य वेळी आरोग्यसेवा घेणे यासाठी आरोग्य साक्षरता आवश्यक आहे.

साक्षरता आणि लोकशाही यांचे नाते अत्यंत महत्त्वाचे आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांना केवळ मतदानाचा अधिकार असणे पुरेसे नसते. शासनाच्या योजना, कायदे, सार्वजनिक प्रश्न आणि नागरिकांचे हक्क व कर्तव्ये यांची माहिती असणे आवश्यक असते. साक्षर नागरिकाला माहिती वाचता येते, तिचे परीक्षण करता येते आणि आपल्या मताची निर्मिती करता येते. त्यामुळे साक्षरता ही लोकशाहीतील अर्थपूर्ण सहभागाची पायाभरणी करते. विवेकी नागरिक समाजातील प्रश्नांवर विचार करू शकतो, सार्वजनिक संस्थांना प्रश्न विचारू शकतो आणि आपल्या अधिकारांसाठी कायदेशीर व लोकशाही मार्गाने प्रयत्न करू शकतो. म्हणून साक्षरता ही केवळ वैयक्तिक विकासाची बाब नसून लोकशाहीच्या सुदृढीकरणाचे साधन आहे.

साक्षरतेबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे हीदेखील काळाची गरज आहे. माहितीच्या युगात अंधश्रद्धा, अफवा आणि अप्रमाणित दावे वेगाने पसरू शकतात. एखादी गोष्ट ऐकली किंवा सामाजिक माध्यमावर पाहिली म्हणून ती खरी मानण्याऐवजी तिच्यामागील तथ्य तपासण्याची सवय लागणे आवश्यक आहे. प्रश्न विचारणे, पुराव्याचा शोध घेणे, तर्कशुद्ध विचार करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे ही शिक्षणाची महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. अक्षरज्ञान जर विवेकाला जन्म देत नसेल तर साक्षरतेचे व्यापक सामाजिक उद्दिष्ट अपूर्ण राहते. त्यामुळे साक्षरतेपासून ज्ञानाकडे आणि ज्ञानापासून विवेकाकडे जाणारा प्रवास घडविणे आवश्यक आहे.

वाचनसंस्कृती ही साक्षर समाजाची खरी ओळख आहे. परीक्षा आणि पदवीपुरते वाचन मर्यादित राहिले तर साक्षरतेची क्षमता संकुचित होते. पुस्तकांशी मैत्री असलेला समाज अधिक विचारशील, संवेदनशील आणि चिकित्सक बनतो. साहित्य, इतिहास, विज्ञान, समाजशास्त्र, चरित्रे, वर्तमानपत्रे आणि विविध ज्ञानशाखांतील ग्रंथ यांचे वाचन व्यक्तीच्या विचारविश्वाचा विस्तार करते. आज डिजिटल माध्यमे मोठ्या प्रमाणावर वापरली जात असली तरी पुस्तकांचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट माहितीच्या वेगवान प्रवाहात सखोल वाचनाची गरज अधिक वाढली आहे. घराघरांत वाचनाची सवय, शाळांमध्ये समृद्ध ग्रंथालये आणि गावागावांत सार्वजनिक वाचनालये निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे.

साक्षरतेच्या प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शिक्षक हा विद्यार्थ्याला केवळ पाठ्यपुस्तकातील माहिती देणारा नसून विचार करण्याची दृष्टी देणारा मार्गदर्शक असतो. विद्यार्थ्यांच्या मनात प्रश्न निर्माण करणे, त्यांच्या अनुभवांना शिक्षणाशी जोडणे, वाचनाची आवड निर्माण करणे आणि ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध स्पष्ट करणे ही शिक्षकाची मोठी जबाबदारी आहे. आज शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर वाढत असताना शिक्षकाची भूमिका कमी होत नसून अधिक महत्त्वाची होत आहे. माहिती सहज उपलब्ध करून देण्यापेक्षा त्या माहितीचे आकलन, विश्लेषण आणि योग्य उपयोग करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट ठरले पाहिजे.

ग्रामीण आणि दुर्गम भागातील साक्षरतेचा प्रश्नही गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. शाळेपर्यंत पोहोचण्याची अडचण, आर्थिक परिस्थिती, स्थलांतर, डिजिटल साधनांचा अभाव आणि कुटुंबातील जबाबदाऱ्या यांमुळे काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होतात. अशा परिस्थितीत शाळेत प्रवेश मिळणे ही पहिली पायरी आहे; परंतु विद्यार्थी शाळेत टिकून राहतो का आणि त्याला अपेक्षित ज्ञान व कौशल्ये मिळतात का, हे अधिक महत्त्वाचे आहे. शिक्षणातील सामाजिक आणि डिजिटल दरी कमी केल्याशिवाय साक्षरतेचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाही. ग्रामीण भागातील शाळा, शिक्षक, ग्रंथालये, डिजिटल सुविधा आणि समुदायाचा सहभाग यांना अधिक बळ देणे आवश्यक आहे.

रोजगाराच्या बदलत्या स्वरूपामुळे साक्षरतेसोबत कौशल्याधारित शिक्षणाची गरज वाढली आहे. आजच्या युवकाला केवळ प्रमाणपत्र नव्हे, तर बदलत्या कामाच्या जगाशी जुळवून घेण्याची क्षमता आवश्यक आहे. संगणकाचे प्राथमिक ज्ञान, संवादकौशल्य, आर्थिक व्यवहारांची समज, समस्या सोडविण्याची क्षमता आणि नवीन कौशल्य शिकण्याची तयारी या गोष्टी रोजगारक्षमतेत भर घालतात. ग्रामीण युवकांसाठी स्थानिक संसाधनांवर आधारित व्यवसाय, लघुउद्योग, शेतीपूरक उद्योग आणि स्वयंरोजगाराच्या संधींचे ज्ञान उपलब्ध करून दिल्यास साक्षरतेचा आर्थिक विकासाशी थेट संबंध निर्माण होऊ शकतो.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्वयंचलित तंत्रज्ञानामुळे शिक्षणाचे आणि रोजगाराचे स्वरूप आणखी बदलणार आहे. या बदलांच्या काळात साक्षरतेचा अर्थ तंत्रज्ञान समजून घेणे आणि त्याचा विवेकी उपयोग करणे असा अधिक व्यापक होईल. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून निर्माण झालेली माहिती योग्य आहे का, तिचा स्रोत काय आहे, तिचा उपयोग कोणत्या मर्यादेत करावा आणि मानवी विवेकाची भूमिका काय असावी, याचे भान निर्माण करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले तरी मानवी मूल्ये, संवेदनशीलता, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व कायम राहणार आहे.

साक्षरतेचा प्रसार ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. शासनाने आवश्यक धोरणे, सुविधा आणि आर्थिक संसाधने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे; परंतु समाजाचा सहभाग त्याला दिशा देतो. शिक्षक, पालक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्रितपणे साक्षरतेला सामाजिक चळवळीचे स्वरूप दिले पाहिजे. एखाद्या निरक्षर व्यक्तीला अक्षरज्ञान देणे, एखाद्या मुलाला शिक्षणात टिकवून ठेवण्यासाठी मदत करणे, एखाद्या महिलेला डिजिटल व्यवहार शिकविणे किंवा एखाद्या ज्येष्ठ व्यक्तीला आवश्यक माहिती समजावून सांगणे या छोट्या कृती समाजपरिवर्तनाच्या मोठ्या प्रक्रियेला हातभार लावू शकतात.

साक्षरता ही एकदाच पूर्ण होणारी प्रक्रिया नाही. जग सतत बदलत आहे आणि त्या बदलांसोबत शिकण्याची गरजही सतत निर्माण होत आहे. त्यामुळे ह्यआयुष्यभर शिक्षणह्व ही संकल्पना साक्षरतेचा पुढील टप्पा आहे. बालकापासून ज्येष्ठ नागरिकापर्यंत प्रत्येक व्यक्तीला नव्या ज्ञानाशी जोडण्याची संधी मिळाली पाहिजे. व्यक्तीने नवे कौशल्य शिकले, वाचनाची सवय ठेवली, तंत्रज्ञान समजून घेतले आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेतले तर तिची साक्षरता अधिक अर्थपूर्ण होते. शिक्षणाची प्रक्रिया शाळेच्या भिंतींपलीकडे आणि पदवीच्या प्रमाणपत्रापलीकडे नेण्याची गरज आहे.

जागतिक साक्षरता दिनाच्या निमित्ताने म्हणूनच साक्षरतेच्या पारंपरिक चौकटीपलीकडे पाहणे आवश्यक आहे. आज आपल्याला केवळ अक्षर ओळखणारे नागरिक नकोत, तर माहिती समजून घेणारे, विवेकाने निर्णय घेणारे, वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणारे, तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणारे, आर्थिकदृष्ट्या सजग आणि सामाजिकदृष्ट्या संवेदनशील नागरिक घडवायचे आहेत. साक्षरता व्यक्तीला माहिती देते; शिक्षण त्या माहितीचे ज्ञानात रूपांतर करते; विवेक त्या ज्ञानाला योग्य दिशा देतो आणि सामाजिक जबाबदारी त्या ज्ञानाचा समाजहितासाठी उपयोग करण्याची प्रेरणा देते. हा संपूर्ण प्रवासच साक्षरतेचा खरा अर्थ स्पष्ट करतो.

८ सप्टेंबरचा जागतिक साक्षरता दिन हा त्यामुळे केवळ एक औपचारिक दिनविशेष न राहता समाजाच्या आत्मपरीक्षणाचा दिवस ठरला पाहिजे. आपल्या आजूबाजूला अजून कोण शिक्षणापासून दूर आहे, कोणाला वाचन–लेखनाची अडचण आहे, कोणाला डिजिटल साधनांचा वापर करता येत नाही, कोणाला आर्थिक व्यवहारांची माहिती नाही किंवा कोणाला आपल्या अधिकारांची जाणीव नाही, याचा विचार करण्याची गरज आहे. साक्षरतेचे यश केवळ आकडेवारीत नसते; ते व्यक्तीच्या बदललेल्या जीवनात दिसते. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःचे नाव वाचते, स्वतःचा अर्ज भरते, स्वतःचा आर्थिक व्यवहार करते, आपल्या मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेते आणि आपल्या हक्कांसाठी आत्मविश्वासाने उभी राहते, तेव्हा साक्षरतेचा खरा विजय होतो.

अक्षर लहान असते; परंतु त्यातून निर्माण होणारी शक्ती अफाट असते. अक्षरातून शब्द, शब्दातून विचार, विचारातून विवेक आणि विवेकातून परिवर्तन जन्माला येते. म्हणून साक्षरतेचा प्रकाश प्रत्येक घरापर्यंत पोहोचणे ही केवळ शैक्षणिक गरज नाही, तर सामाजिक न्यायाची आणि राष्ट्रनिर्मितीची आवश्यकता आहे. समाजातील कोणताही घटक ज्ञानापासून वंचित राहू नये, प्रत्येकाला शिकण्याची संधी मिळावी आणि प्रत्येक व्यक्तीला आपल्या ज्ञानाच्या बळावर सन्मानाने जगता यावे, हेच साक्षरतेचे अंतिम ध्येय असले पाहिजे. अक्षरज्ञानातून स्वावलंबन, स्वावलंबनातून आत्मविश्वास, आत्मविश्वासातून सहभाग आणि सहभागातून परिवर्तन हा साक्षरतेचा खरा प्रवास आहे. या प्रवासात एकही व्यक्ती मागे राहू नये, प्रत्येक मनात शिकण्याची जिज्ञासा निर्माण व्हावी आणि ज्ञानाची ज्योत पिढ्यानपिढ्या तेवत राहावी, हाच जागतिक साक्षरता दिनाचा खरा संदेश आहे.



– डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

## गणेशोत्सव व अनंत चतुर्दशीनिमित्त सोलापूर जिल्ह्यात मद्यविक्री दुकाने बंद

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील देशी–विदेशी मद्य व ताडी विक्रीची दुकाने दोन दिवस बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, 1949 मधील कलम 142 अन्वये दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालय, राज्य उत्पादन शुल्क विभाग, सोलापूर यांच्या आदेशानुसार दि. 14 सप्टेंबर 2026 रोजी श्री गणेश चतुर्थीनिमित्त सोलापूर जिल्ह्यातील सर्व देशी व विदेशी मद्यविक्रीची दुकाने विक्रीसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत.

तसेच दि. 25 सप्टेंबर 2026 रोजी अनंत चतुर्दशीनिमित्त परवाना अटींशर्तींनुसार सोलापूर जिल्ह्यातील सर्व देशी व विदेशी मद्यविक्रीची दुकाने विक्रीसाठी बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आहेत.

गणेशोत्सव कालावधीत कायदा व सुव्यवस्था तसेच उत्सव शांततेत पार पडावा, या उद्देशाने प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत.

# सोलापूर जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करा; संकटग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत द्या– खा. प्रणिती शिंदे

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर जिल्ह्यात पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके गंभीर संकटात आली असून, निसर्गाच्या अवकृपेमुळे बळीराजा पूर्णपणे हवालदिल झाला आहे. मान्सूनच्या सुरुवातीला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरणी केली, मात्र त्यानंतर पावसाने पाठ फिरवल्याने अनेक ठिकाणी पिके जळून जात आहेत. हातातोंडाशी आलेले पीक डोळ्यांसमोर करपताना पाहून शेतकऱ्यांची स्वप्नेही जळून चालली आहेत.

या गंभीर परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील पाटकुळ, खुनेश्वर, डीकसळ आणि भैरववाडी या गावांना भेट देत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पावसाअभावी जळून चाललेल्या पिकांची पाहणी केली. विशेषतः पावसाअभावी करपलेल्या सोयाबीनसह अन्य खरीप पिकांची स्थिती पाहून त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.



यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रशासनाला तातडीने पिकांचे पंचनामे करून शेतकऱ्यांच्या नुकसानीचा अहवाल तयार करण्याचे निर्देश दिले. तसेच पावसाअभावी निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची शासनाने तातडीने दखल घेऊन सोलापूर जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करून संकटग्रस्त शेतकऱ्यांना योग्य व भरीव नुकसानभरपाई तसेच सर्वतोपरी मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

पावसाअभावी हातातोंडाशी आलेली पिके डोळ्यांसमोर जळून जात असताना शेतकरी मोठ्या संकटात आहे. या दुःखाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे हीच खरी एकजूट आहे. प्रत्येक गावातील शेतकऱ्यांच्या पाठीशी मी ठामपणे उभी असून, त्यांना शासनाकडून योग्य मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार आहे, अशी ग्वाही खासदार प्रणिती शिंदे यांनी दिली.

या दौऱ्यादरम्यान ग्रामस्थांनी परिसरातील विविध विकासकामांच्या मागण्याही खासदार प्रणिती शिंदे यांच्यासमोर मांडल्या. शिरापूर उपसा सिंचन योजनेची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत, खुनेश्वर गावाला उजनीचे पाणी मिळावे, तसेच डीकसळ येथील पुलाच्या कठड्याची दुरुस्ती करून नादुरुस्त रस्ता तातडीने दुरुस्त करावा, अशा मागण्या ग्रामस्थांनी केल्या. रस्ता खराब झाल्यामुळे एस.टी. बससेवाही बंद झाल्याने नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याचेही यावेळी निदर्शनास आणून देण्यात आले.

खासदार प्रणिती शिंदे यांनी या सर्व मागण्यांची दखल घेत संबंधित विभागांकडे पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, लक्ष्मण मगर, मोहन चव्हाण, चंद्रहार चव्हाण, शंकर चव्हाण, बाळासाहेब आतकरे, विकास पाटील, ब्रह्मदेव चव्हाण, मगर सरपंच, वसंत चव्हाण, रामहरी जाधव, संभाजी वऱ्हाडे, अशोक खोत, बजरंग पाटील, महादेव येमले, आशिष खोत, विकास चव्हाण, नवनाथ घाडगे, बजरंग पाटील, युवराज रणदिवे, रणजीत धावणे, राजेंद्र मोटे, रुपाली आडसुळ, संभाजी सातपुते, दत्ता सावंत, शिवाजी वसेकर, वीर सेन देशमुख, भैय्यासाहेब देशमुख, लोंढे गुरुजी यांच्यासह शेतकरी बांधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वात्रटिका

### कॉमेडी हस्य जत्रा

उगाचच येते पोटात कळ
आणि नेहमी तोंड वाकडे...
काम काहीच नाही त्यांना
ते नेहमीच रिकामटेकडे...
शेजारीच असतो रोबोट
उभा कधीही कायम सदा...
कॉमेडी हस्य जत्रा हिणवले नि
किती गुण वर्तावे तुझे सदा...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# उद्योग व व्यापार विभागाच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी तेजस बोबडे यांची नियुक्ती

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गटाच्या उद्योग व व्यापार विभागाच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी तेजस बोबडे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचे पत्र खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गटाच्या उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत तेजस बोबडे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्यासाठी तसेच उद्योग व व्यापार क्षेत्रातील नागरिक, व्यावसायिक आणि उद्योजकांशी पक्षाचा संपर्क अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने ही निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

तेजस बोबडे यांनी यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) गटाचे मोहोळ तालुकाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे. तालुकाध्यक्षपदाच्या कार्यकाळात त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी, विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग घेण्यासाठी तसेच पक्षाच्या विचारधारेचा प्रसार करण्यासाठी उल्लेखनीय काम केले. त्यांच्या संघटन कौशल्याची आणि पक्षासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊनच त्यांच्यावर उद्योग व व्यापार विभागाच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

दरम्यान, तेजस बोबडे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर ज्येष्ठ नेते संजय क्षीरसागर, तालुकाध्यक्ष सतीश पाटील, विधानसभा अध्यक्ष रणजीत चवरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी त्यांचा सत्कार करून नवीन जबाबदारीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



नवीन जबाबदारीच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक, लघुउद्योजक तसेच विविध व्यावसायिक घटकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या पक्षाच्या माध्यमातून शासन दरबारी मांडण्यासाठी प्रयत्न करण्याचे आव्हान आता तेजस बोबडे यांच्यासमोर असणार आहे. दरम्यान पक्षाने दिलेली जबाबदारी सक्षमपणे पार पाडून सोलापूर जिल्ह्यात उद्योग व व्यापार विभागाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे तेजस बोबडे यांनी यावेळी सांगितले.

# तथागत महिला बचत गटाच्या यशस्वी वाटचालीला पाच वर्षे; महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** शिक्षक दिनाचे औचित्य साधून करमाळा शहरातील भीमनगर येथील तथागत महिला बचत गटाने यशस्वीरित्या पाच वर्षे पूर्ण केल्याबद्दल गटातील महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. करमाळा नगर परिषद अंतर्गत दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाच्या माध्यमातून या बचत गटाची स्थापना करण्यात आली आहे.



तथागत महिला बचत गटाच्या पाच वर्षांच्या यशस्वी वाटचालीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात गटाच्या कार्याचा तसेच आर्थिक व्यवहाराचा पाच वर्षांचा लेखाजोखा उपस्थित मान्यवरांसमोर मांडण्यात आला. बचत, नियमित आर्थिक व्यवहार आणि सामूहिक सहभागाच्या माध्यमातून गटाने पाच वर्षांचा टप्पा पूर्ण केला. या बचत गटाला करमाळा नगर परिषदेचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी तुषार टांकसाळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच दीनदयाळ अंत्योदय योजनेचे पदाधिकारी गणेश शिंदे, सोनाली पिसे आणि शोभा गवळी यांचेही मार्गदर्शन गटाला मिळाले. कार्यक्रमादरम्यान दीनदयाळ अंत्योदय योजनेचे पदाधिकारी गणेश शिंदे, सोनाली पिसे आणि शोभा गवळी यांचा तथागत महिला बचत गटाच्या अध्यक्षा पुष्पा भीमराव कांबळे व सचिव मीना गोरख कांबळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तथागत महिला बचत गटाने पाच वर्षे पूर्ण केल्याबद्दल गटातील प्रत्येक सदस्याला ४६ हजार ७०० रुपये लाभांश देण्यात आला. बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक शिस्त आणि परस्पर सहकार्याची जपणूक करत पाच वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण केल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी गटाच्या सचिव मीना कांबळे, सदस्या सुजाता कांबळे, जनाबाई थोरात, आशा साळवे, मंदाकिनी कदम, उज्वला कांबळे, सविता कांबळे, मनीषा कांबळे आणि लता मोहिते यांच्यासह अन्य सदस्य उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार गटाच्या अध्यक्षा पुष्पा भीमराव कांबळे यांनी मानले. त्यानंतर अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# प्रारुप मतदार यादी जाहीर; दावे व हरकती 30 सप्टेंबरपर्यंत दाखल करण्याचे आवाहन

**पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):-** विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत 252 पंढरपूर विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली असून या मतदार यादीत नाव समाविष्ट नसलेल्या पात्र मतदारांनी तसेच दावे व हरकती असलेल्या नागरिकांनी 30 सप्टेंबर 2026 पर्यंत संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तसेच तहसिल कार्यालय निवडणूक शाखेत दावे व हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

252 पंढरपूर विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी दि. 31 ऑगस्ट 2026 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. मतदारांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव, पत्ता, वय, लिंग, मतदार ओळखपत्र क्रमांक तसेच मतदार केंद्राची माहिती आदी तपशिल तपासणी करावा.तसेच 01 ऑक्टोबर 2026 या अर्हता दिनांकास किंवा त्यापूर्वी वयाची 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या नवमतदारांनी आवश्यक घोषणापत्र व कागदपत्रांसह नमुना ६ भरून मतदार यादीत आपले नाव नोंदवावे. मतदार यादीतील चुकीची अथवा मयत,स्थलांतरीत मतदारांची नोंद वगळण्यासाठी नमुना क्र. 07 हा अर्ज करता येईल. तसेच मतदार यादीमधील चुकीच्या नोंदीत नाव, वय, लिंग, नातेसंबंध, पत्ता बदल या दुरुस्तीकरीता नमुना क्र. 08 हा अर्ज करता येईल. नागरिकांना ऑनलाईन सुविधा voters.eci.gov.in याव्दारेही ऑनलाईन अर्ज व आवश्यक कार्यवाही करता येईल.

लोकशाही बळकट करणेसाठी प्रत्येक पात्र नागरिकाने या पुनरिक्षण कार्यक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा. तसेच पात्र मतदारांनी आपली तसेच आपल्या कुटूंबीयांची नावे मतदार यादीत आहेत किंवा नाही याची तपासणी करून आवश्यक असल्यास दावे व हरकती नोंदवाव्यात असे आवाहनही मतदार नोंदणी अधिकारी तथा प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

# संगमेश्वर कॉलेजच्या तनुश्रीची 'कॅम्पस से संसद'साठी निवड

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित करण्यात आलेल्या ह्यकॅम्पस से संसद : अटल इरादे, युवा कदमह्णया महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी संगमेश्वर महाविद्यालयातील बीबीए भाग-३ची विद्यार्थिनी तनुश्री प्रदीप बिराजदार हिची निवड झाली आहे. महाराष्ट्रातील निवडक महाविद्यालयांमधून झालेल्या निवडीत तनुश्रीने स्थान मिळविल्याने संगमेश्वर शिक्षण संस्थेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.



तनुश्रीच्या निवडीबद्दल संगमेश्वर शिक्षण संस्थेच्या सचिव ज्योती काडादी यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी तनुश्रीचे अभिनंदन करून, आपल्या कर्तृत्वातून संस्थेच्या नावलौकिकात भर घालावी, अशा शुभेच्छा दिल्या.

'कॅम्पस से संसद' उपक्रमासाठी विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया विविध टप्प्यांत पार पडली. महाविद्यालयीन पातळीवर 'प्रश्नमंजूषा आणि निबंध स्पर्धा' घेण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्र शासनातर्फे ऑनलाइन मुलाखत घेऊन अंतिम निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेत तनुश्रीने उल्लेखनीय कामगिरी करत अंतिम यादीत स्थान मिळविले.

'विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवा पिढीच्या, विशेषतः जनरेशन झीच्या, विचारांना जाणून घेणे तसेच देशाने केलेल्या सर्वांगीण प्रगतीचा तरुणांना प्रत्यक्ष परिचय करून देणे हा आहे. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील निवडक विद्यार्थ्यांना दिल्ली येथील संसद, संसद सदस्य, विविध सरकारी मुख्यालये, धोरणनिमार्ते तसेच विविध संस्थांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे.

याशिवाय विद्यार्थ्यांना देशातील ऐतिहासिक स्थळे तसेच आधुनिक भारताच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या विविध नामवंत संस्था व कार्यालयांना भेटी देण्यात येणार आहेत. या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारताच्या लोकशाही व्यवस्थेची, प्रशासनाची, धोरणनिर्मितीची आणि देशाच्या विकासप्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती मिळणार आहे.

तनुश्री बिराजदार हिच्या या उल्लेखनीय निवडीबद्दल संगमेश्वर शिक्षण संस्थेचे चेअरमन धर्मराज काडादी यांनी अभिनंदन केले. यावेळी संस्थेचे शैक्षणिक व मूल्यमापन सल्लागार प्रा. डॉ. प्रमोद दर्गोपाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, कला शाखेचे उपप्राचार्य प्रा. डॉ. राजकुमार मोहोरकर, बीबीए विभागप्रमुख प्रा. डॉ. अर्जुन चौधरी आदी उपस्थित होते.

तनुश्रीची 'कॅम्पस से संसद'साठी झालेली निवड ही संगमेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यक्तिमत्त्व विकासाला मिळालेली मोठी संधी मानली जात आहे.


**आमच्याकडे केशर आंबा, हापूस,**
**मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे,**
**इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे**
**होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**
**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**
**संपर्क - 9422602337, 8317212037**



## अनगर नगरपंचायत, अनगर

**ता.मोहोळ, जि.सोलापूर पिन-४१३२१४**
**स्थापना - ०१/११/२०२१**

**दुरध्वनी क्रमांक : ०२१८९-२४८५२३** Email ID: comcangar7@gmail.com

जा.क्र.२०२६/६७४ दिनांक ०७/०९/२०२६

### जाहीर आवाहन

अनगर नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सन्माननीय नागरिक, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, मूर्तिकार व तरुण मंडळांना या जाहीर आव्हानाद्वारे कळिवण्यात येते की, चालू वर्षी सप्टेंबर २०२६ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होत आहे. पर्यावरण आणि हवामान बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय (दि. ०१ ऑगस्ट २०२४ व दि. ०१ सप्टेंबर २०२६) तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पत्रानुसार (जावक क्र. मप्रनियम/उपप्रासो/६०९, दिनांक ०३/०९/२०२६) पर्यावरण पूरक सण साजरा करण्याबाबत आणि प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या (पी.ओ.पी.) मूर्ती विसर्जनाबाबत काटेकोर मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत.

त्या अनुषंगाने आपल्या शहरात पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आणि जलप्रदूषण रोखण्यासाठी खालीलप्रमाणे आवाहन करण्यात येत आहे:

✻ पर्यावरण पूरक गणेशोत्सव: यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करून शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

✻ शाडूच्या मातीच्या मूर्तीचा वापर: नागरिकांनी व गणेश मंडळांनी प्लॅस्टर ऑफ पॅरिस (P.O.P.) ऐवजी शाडूच्या मातीपासून किंवा इतर पर्यावरणपूरक द्रव्यांपासून तयार केलेल्या गणपती मूर्तीची स्थापना करावी.

✻ कृत्रिम तलावांचा वापरः नैसर्गिक जलस्त्रोतांचे प्रदूषण टाळण्यासाठी गणपती मूर्तीचे विसर्जन अनगर नगर पंचायतीमार्फत तयार करण्यात येणाऱ्या कृत्रिम तलावांमध्येच करावे.

✻ प्रशासनास सहकार्यः शासनाने व प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या नियमांचे पालन करून जनजागृती मोहिमेत सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.

पर्यावरण रक्षणाच्या या लोकचळवळीत अनगर नगर पंचायत क्षेत्रातील सर्व नागरिकांनी व मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

**सही/-**
**(सुरेश भदर)**
**मुख्याधिकारी**
**अनगर नगरपंचायत, अनगर**



## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ■ | ३ | | ४ | ■ | ५ | | ६ |
| | ■ | | ■ | ७ | | ■ | ८ | ९ | | ■ | |
| १० | ११ | | १२ | ■ | १३ | १४ | ■ | | ■ | १५ | |
| १६ | | ■ | १७ | | ■ | १८ | | | ■ | १९ | |
| ■ | २० | २१ | | ■ | २२ | | ■ | ■ | २३ | | ■ |
| ■ | ■ | | ■ | २४ | ■ | २५ | २६ | | | ■ | २७ |
| २८ | २९ | | ३० | | ■ | ३१ | | ■ | ३२ | ३३ | ■ |
| ३४ | | ■ | | ■ | ३५ | ■ | ३६ | ३७ | ■ | ३८ | ३९ |
| | ■ | ४० | | ४१ | | ■ | ४२ | | ४३ | ■ | |
| ■ | ४४ | | ■ | | ■ | ४५ | ■ | ४६ | | ■ | ■ |
| ४७ | | | ■ | ४८ | | | ४९ | ■ | ५० | | ५१ |
| | ■ | ५२ | | | ■ | ५३ | | | | ■ | |

**उभे शब्द :** १) नाना पाटेकर, अनिल कपूर, अक्षय कुमार यांचा एक विनोदी चित्रपट, स्वागत (इंग्रजीत) २) पोवाडे गाणारा ३) उलटी, वमन ४) बारा गुणिले पाच ५) याचे कणिस भाजून खातात ६) क्रिकेटमधील सिक्सर (मराठीत) ९) दहा गुणिले सात ११) चौघड्याच्या जोडीचे वाद्य १२) तोपर्यंत (ग्रामीण भाषेत) १४) सर्वत्र पसरलेला सुगंध १५) पुरूषांचा नेसावयाचा पंचा २१) श्वास घेण्याची क्रिया २३) छोटा दिवा २४) कपाची जोडीदारीण २६) पटकन, त्वरेने एक फुलझाड २९) झी मराठी वरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या ३०) विदूषक ३३) विषमच्या विरूध्दार्थी ३५) पाच आणि दोन मिळून होणारी संख्या ३७) छोटा, बारीक ३९) पतीची आई ४०) एक अभिनेता-**** खान ४१) इराकची राजधानी ४३) कापड फाटताना होणारा आवाज ४४) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात ४५) मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेता-*** भावे ४७) बोल्टचा जोडीदार, टन उलट लिहा ४९) पैसा, संपत्ती ५१) कविता बनविणारा

**आडवे शब्द :** १) हवामानाचा अंदाज वर्तविणारे कार्यालय ३) भारताचे दक्षिणेकडील एक राज्य ५) एक भारतीय फलंदाज-*** पांडे ७) मांजरामधील नर जात ८) अन्नाचा कण श्वासनलिकेत गेल्यास लागतो *** १०) व्यायाम, मेहनत १३) रांग, माळ १५) खतरा १६) माईंड (मराठीत), चित्त १७) जंगल, अरण्य १८) आई (इंग्रजीत) १९) जरचा साथीदार २०) देव २२) एक मराठी महिना २३) परंतु, पक्ष्याचे पंख (हिंदीत) २५) कोकणातील एक पर्यटनाचे स्थळ २७) उन्हाळ्यातील एक महिना २८) मराठी चित्रपट सृष्टीतील एक ज्येष्ठ अभिनेते ३१) वट उलट लिहा ३२) पंधरा दुणे ३४) रानटी बैल ३६) उद्या (हिंदीत) ३८) शरीरावरील मोठा तीळ ४०) लिंबू पाण्याचे पेय ४२) विहिरीतून पाणी खेचण्याचे पूर्वीचे चक्राकार साधन ४४) वर्ष (हिंदीत) ४६) मादीच्या विरूध्दार्थी ४७) नव्वदच्या दशकातील हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेत्री ४८) समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ५०) कडक, न दबणारे ५२) नऊ गुणिले दहा ५३) मेंढीपालन करणारा एक वर्ग


## सुडोकु - 50

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 6 | 5 | 9 | 2 | 8 |
| 1 | | 5 | | 2 | | 7 | 6 | |
| | | 2 | 8 | | | | | |
| 5 | 3 | | 4 | 8 | 9 | | | |
| 6 | 4 | | 7 | | | 8 | 3 | |
| | | 7 | | 1 | | | 4 | 9 |
| 4 | 9 | | | | 8 | 1 | 5 | 7 |
| | 1 | 8 | | | | 3 | | |
| | | | | 9 | 1 | 2 | | |

# विठ्ठलराव शिंदे कारखान्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत शेतकरी मेळावा

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** पिंपळनेर येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्या वतीने येत्या १२ किंवा १६ ऑक्टोबर रोजी भव्य शेतकरी मेळावा आयोजित करण्यात येणार असून या मेळाव्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन आमदार बबनराव शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्यामुळे आगामी शेतकरी मेळाव्याकडे माढा तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

सध्या साखरेला बाजारात चांगली मागणी असून टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याने कारखाना लवकर सुरू करण्याच्या हालचाली सुरू आहेत. १७ किंवा १९ सप्टेंबर रोजी रिजनल डायरेक्टर अग्निहोत्री यांच्या हस्ते सकाळी ११ वाजता पिंपळनेर, तर दुपारी २ वाजता करकंब युनिट येथे बॉयलर पूजा होणार आहे. यंदा दुष्काळजन्य परिस्थितीचा ऊस पिकाला मोठा फटका बसला असून काही ठिकाणी ऊस चाऱ्यासाठी वापरण्याची वेळ आली आहे, तर पाणी उपलब्ध असलेल्या भागात शेतकरी ऊस जगविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे यंदाचा गळीत हंगाम सुमारे तीन महिने चालण्याची अपेक्षा आमदार शिंदे यांनी व्यक्त केली. कारखान्याकडे सध्या १ लाख ७१ हजार क्विंटल साखर शिल्लक असून सरासरी ३९३९ रुपये दर मिळाला आहे, तर शेवटचे टेंडर ४४०० रुपयांनी सुटले आहे. दिवाळीनिमित्त शेतकऱ्यांना ३० रुपये किलो दराने ५० किलो साखर घरपोच देण्यात येणार असून करकंब युनिटमार्फत ४ सप्टेंबरपासून, तर पिंपळनेर युनिटमार्फत ६ सप्टेंबरपासून गावोगावी साखर वाटप सुरू होणार आहे. येत्या १२ सप्टेंबरला कारखान्याची जनरल मीटिंग, तर २० सप्टेंबरला कै. विठ्ठलराव शिंदे यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यावेळी कृषी उत्पन्न



बाजार समितीचे चेअरमन बंडूनाना ढवळे, संचालक रमेश पाटील, कारखान्याचे संचालक सचिन देशमुख, नागेशबापू खटके यांच्यासह माढा तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते. दरम्यान, आमदार बबनराव शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर सामाजिक, धार्मिक, आरोग्य व क्रीडा क्षेत्रातील विविध उपक्रम राबविण्यात येणार असून त्यामध्ये १० हजार रक्तदात्यांचे रक्तदान, गावोगावी मागणीनुसार कीर्तन-प्रवचन, आरोग्य शिबिरे, 'खेळ पैठणीचा', बैलगाडा शर्यत, विष्णुपुराण कथा, क्रिकेट सामने तसेच ७५ हजार वृक्षारोपणाचा संकल्प करण्यात आला आहे. दुष्काळी भागासाठी विशेष कामे करण्यावरही भर दिला जाणार असल्याचे आमदार शिंदे यांनी सांगितले.

### अमृत महोत्सवी वर्षातील उपक्रम

१० हजार रक्तदात्यांचे रक्तदान, ७५ हजार वृक्षारोपण, आरोग्य शिबिरे, कीर्तन-प्रवचन, 'खेळ पैठणीचा', बैलगाडा शर्यत, विष्णुपुराण कथा,क्रिकेट सामने, दुष्काळी भागासाठी विशेष कामे

### आमदार बबनराव शिंदे

माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त माढा तालुक्यात वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

### मुख्य संकल्प :

१० हजार रक्तदात्यांचे रक्तदान, ७५ हजार वृक्षारोपण,आरोग्य शिबिरे,धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, दुष्काळी भागासाठी विशेष उपक्रम रागवणार असल्याचे सांगितले

# सोलापूर जिल्हा तात्काळ कोरडा दुष्काळ म्हणून जाहीर करा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अत्यल्प पावसामुळे सोलापूर जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने दखल घेऊन सोलापूर जिल्हा दुष्काळमुक्त घोषित करून शेतकरी, पशुधन आणि ग्रामीण जनतेसाठी तात्काळ चारा छावणी सुरू करण्यात यावेत या मागणीचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत माननीय मुख्यमंत्री यांना करण्यात आली आहे.



सोलापूर जिल्ह्यात यंदा अत्यंत कमी व अनियमित पाऊस झाल्यामुळे ग्रामीण भागातील शेती व्यवस्था गंभीर संकटात सापडली आहे. पावसाअभावी खरीप पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या स्थितीत आहेत. शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने पेरणी, बियाणे, खते, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला; मात्र पुरेसा पाऊस न झाल्याने हा संपूर्ण खर्च वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

सोलापूर हा कायमच पर्जन्यछायेचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे पावसातील थोडीशी तूटदेखील शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी मोठे संकट निर्माण करते. सध्याची परिस्थिती पाहता अनेक तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झालेली असून प्रशासनाने केवळ कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन परिस्थितीचे सर्वेक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे.

अल्प पावसामुळे सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी, कांदा तसेच इतर खरीप पिकांचे मोठे नुकसान होत आहे. काही भागात पिकांची उगवण व्यवस्थित झालेली नाही, तर काही ठिकाणी उगवलेली पिके पाण्याअभावी सुकत आहेत.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर याचा थेट परिणाम होणार असून शेतीचा खर्चही निघण्याची शक्यता कमी झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढण्याची आणि ग्रामीण अर्थव्यवस्था आणखी अडचणीत येण्याची शक्यता आहे.

पावसाअभावी विहिरी, बोअरवेल, तलाव, बंधारे आणि इतर जलस्रोतांमधील पाणीसाठा कमी होत आहे. आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील गावांसाठी आतापासूनच पाणी नियोजन करणे गरजेचे आहे. शेतीसोबतच पशुधनावरही दुष्काळाचा मोठा परिणाम होत आहे. हिरवा चारा उपलब्ध नसल्याने पशुपालक अडचणीत आले आहेत. त्यामुळे शासनाने तातडीने चारा छावण्या, चारा डेपो आणि पशुधनासाठी पाण्याची व्यवस्था करण्याचे नियोजन करावे.

सोलापूर जिल्ह्यातील सद्यस्थितीचा गांभीर्याने विचार करावा व प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पाहणी करून वास्तविक परिस्थितीचा अहवाल शासनाकडे तातडीने पाठवावा.

सोलापूर जिल्ह्यात दरवर्षी पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकरी संकटात सापडतो. त्यामुळे केवळ दुष्काळ जाहीर करून मदत देणे हा कायमस्वरूपी उपाय नाही. जिल्ह्यातील पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे, नदी-जोड प्रकल्पांचा व्यवहार्य अभ्यास, उपलब्ध जलस्रोतांचे पुनर्भरण, शेततळी, बंधारे आणि सूक्ष्म सिंचनाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

'पाणी अडवा - पाणी जिरवा' या तत्त्वावर व्यापक जलसंधारण अभियान राबवून सोलापूर जिल्ह्याला भविष्यातील दुष्काळापासून कायमस्वरूपी मुक्त करण्यासाठी ठोस आराखडा तयार करावा.

आज सोलापूर जिल्ह्यातील शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहे. पावसाअभावी शेतीचे नुकसान होत असताना शेतकऱ्याला केवळ आश्वासनांची नव्हे, तर तातडीच्या प्रत्यक्ष मदतीची आवश्यकता आहे.

त्यामुळे शासन व प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सर्वेक्षण करून सोलापूर जिल्हा दुष्काळमुक्त करण्यासाठी ठोस निर्णय घ्यावा, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत द्यावी आणि पिण्याचे पाणी व पशुधनासाठी चारा-पाणी उपलब्ध करून द्यावे. त्याचबरोबर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मध्यरात्री वीज उपलब्ध करून देण्यात येते त्यामुळे शेतकऱ्यांना खूप मोठ्या संकटांना सामना करावा लागतो त्यामुळे शेतकऱ्यांना रात्रीच्या ऐवजी दिवसभर वीज देण्यात यावी. अशा मागण्या करण्यात आल्या.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्रात देशांतून संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनलताई दास जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश डोंगरे जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले जिल्हा कार्याध्यक्ष मनीषा कोई शहर उपाध्यक्ष माधुरी चव्हाण दक्षिण तालुका प्रमुख जैनुद्दीन नदाफ सविता भोसले अरविंद शेळके विश्वजीत गंभीरे आधी उपस्थित होते.

# 'सुखसागर ऑर्केस्ट्रा बार'वर मध्यरात्री छापा!

## २६ ग्राहकांवर कारवाई; २८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात सुरू असलेले अवैध धंदे, नियमबाह्य डान्सबार आणि कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण करणाऱ्या गैरप्रकारांवर ग्रामीण पोलिसांनी जोरदार कारवाई सुरू केली आहे. सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मौजे भोगाव (ता. उत्तर सोलापूर) येथील 'सुखसागर ऑर्केस्ट्रा बार'वर विशेष पथकाने रविवारी (६ सप्टेंबर २०२६) मध्यरात्री १२:१५ वाजता छापा टाकला. या कारवाईत २६ गिऱ्हाईक आरोपींसह संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून, तब्बल २८ लाख २५ हजार १० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### नोटांची उधळण अन अश्लील नृत्य

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशानुसार व अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक गणेश शिंदे यांच्या नेतृत्वातील विशेष पथकाने ही कारवाई केली. भोगाव येथील सुखसागर ऑर्केस्ट्रा बारमध्ये नियमांचे उल्लंघन करून महिला तोकडे कपडे घालून विभत्स व अश्लील हावभावांसह हिंदी-मराठी गाण्यांवर नृत्य करत होत्या, तर ग्राहक त्यांच्यावर पैशांची उधळण करत असल्याचे पथकाला निदर्शनास आले. या ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे आणि कायदेशीर तरतुदींचे उघड उल्लंघन होत असल्याचे निष्पन्न झाले.



### अवैध धंदे खपवून घेणार नाही

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात कोणत्याही स्वरूपाचे अवैध धंदे, नियमबाह्य डान्सबार, अश्लील नृत्याचे प्रकार अथवा कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारे प्रकार कदापि खपवून घेतले जाणार नाहीत. यामध्ये सहभागी असणाऱ्यांवर तसेच त्यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष मदत करणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल.

**- अतुल कुलकर्णी,** पोलीस अधीक्षक

### २८ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त

छाप्यादरम्यान पोलिसांनी तेथील १५ महिला व उपस्थित ग्राहकांची सखोल चौकशी करून त्यांचे पत्ते व नावे निष्पन्न केली. घटनास्थळावरून रोख रक्कम, मोबाईल हँडसेट आणि इतर साहित्य असा एकूण २८ लाख २५ हजार १० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### विविध कलमांन्वये गुन्हे दाखल

या प्रकरणी बारचे चालक, मालक, व्यवस्थापक, ग्राहक तसेच अश्लील नृत्य करणाऱ्या महिलांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २९६, २२३, ३(५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३/१३१ तसेच महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपान कक्ष, बाररूम यामधील नृत्य व अश्लील नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबतच्या अधिनियमांतील विविध कलमांनुसार कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

### कारवाई करणारे पथक

ही कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक गणेश शिंदे, सपोनि श्वेता चव्हाण, सपोनि विश्वजीत भोसले, मसपोनि शारदा नवनाथ घोळवे, सपोनि प्रवीण जर्दे, पोहेकॉ प्रवीण बापू वाळके, पोशि निलेश भारत जानकर, पोशि आदित्य चंद्रशेखर कांबळे, पोशि अनिल भास्कर पवार तसेच सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या अधिकारी व अंमलदारांनी संयुक्तपणे पार पाडली.

# शिवप्रबोधनाचा जागर!

## भुईकोट किल्ल्यात जमले छत्रपती शिवरायांचे मावळे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** परमेश्वराने दिलेले जीवन सुंदर आहे. त्यामुळे कोणत्याही कारणामुळे तरुणांनी नैराश्यात जाऊ नये. संकटाच्या काळात शिवचरित्राचा आधार घ्यावा. सकारात्मक दृष्टिकोनाचा सर्वात मोठा स्त्रोत शिवचरित्र आहे, असे प्रतिपादन शिवचरित्र व्याख्याते डॉ. शिवरत्न शेटे यांनी केले. हिंदवी परिवारातर्फे रविवारी भुईकोट किल्ल्यात शिवप्रबोधन कार्यक्रमात डॉ. शिवरत्न शेटे यांनी तरुणांना आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रारंभी राष्ट्रगीतानंतर हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूतीर्चे पूजन झाले. यानंतर हिंदवी परिवाराचे राज्य उपाध्यक्ष आणि माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगावकर यांनी शिवचरित्राच्या काही भागाचे वाचन केले.

डॉ. शेटे म्हणाले, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत महाराष्ट्रातील शूर मावळ्यांनी मुघल आदिलशाही कुतुबशाही बरीदशाही निजामशाही अशा शत्रूंची झुंज दिली. घाबरणे, निराश होणे हे मावळ्यांना माहितीच नव्हते. आपणही त्यांचाच आदर्श घेऊन जीवनाची वाटचाल केली पाहिजे. देशाच्या आणि समाजाच्या उन्नतीत मातृशक्तीचे योगदान महत्त्वाचे आहे गर्भवती असताना आपल्या पित्याची आणि भावाची झालेली हत्या पाहूनही हिंदवी स्वराज्य स्थापनेचे ध्येय साध्य करण्यासाठी कणखरपणे जीवन व्यतीत करणाऱ्या जिजामातांचा आदर्श माता-भगिनींनी घेतला पाहिजे, असेही डॉ. शिवरत्न शेटे यांनी सांगितले.

हिंदू धर्म म्हणजेच भारतीय संस्कृती विज्ञानाने परिपूर्ण आहे. आपल्या इतिहासात विज्ञान आहे. आपले पूर्वज विज्ञानवादी होते. तरुणांनी शिवभारत, जेधे शकावली, सभासद बखर अशी अस्सल साधने वाचून श्री शिवछत्रपतींचा आदर्श घ्यावा. छत्रपती श्री शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या मार्गावर वाटचाल केली तर सिया अग्रवाल, इंदापूरमध्ये मुलांकडून आई-वडिलांना झालेली मारहाण, छत्रपती संभाजी नगर मध्ये झालेली आत्महत्या अशा घटना घडणार नाहीत, असेही डॉ. शिवरत्न शेटे यांनी सांगितले. 'शिवचरित्रातील आदर्श डोळ्यांसमोर ठेवून नैराश्यात जाणार नाही हा संकल्प डॉ. शिवरत्न शेटे यांनी 'जेन झी' कडून वदवून घेतला.

या कार्यक्रमास सोलापूर शहरासह पंढरपूर, धाराशिव, वळसंग, मंद्रूप, मैदर्गी या भागातूनही मुली, महिला शिवभक्तही मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

यावेळी हिंदवी परिवाराचे शहर प्रमुख तुषार आवताडे, राज्य उपाध्यक्ष गुरुशांत धुत्तरगावकर, नगरसेवक अमोल शिंदे, माजी उपमहापौर पद्माकर काळे, श्रीकांत डांगे, अविनाश महागावकर, प्रशांत बडवे, महेश धाराशिवकर आदी उपस्थित होते. संपूर्ण वंदे मातरम ने कार्यक्रमाचा समारोप झाला.

### 'मी तुमचा मामा, मला समस्या सांगा'

तरुणांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवावा. संवादाचा अभाव असेल, बोलणे बंद झाले तर समस्या वाढतात. तुमच्यातच भारताची महासत्ता दडलेली आहे. मी तुमचा मामा आहे. तुम्हाला कोणतीही समस्या असेल तर मला पालकांसोबत येऊन भेटा, असे आवाहनही डॉ. शिवरत्न शेटे यांनी केले.

# श्रीपूरमध्ये बैलपोळा सणाचे पार्श्वभूमीवर ग्राहकांची खरेदीसाठी तुरळक गर्दी



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** बैल पोळा सणासाठी श्रीपूरमध्ये गेल्या पंच्याहत्तर वर्षापासून सुरू असलेले शरद तिवाटणे यांचे बैल पोळा सणासाठी वेगवेगळ्या साहित्यांचे दुकान या वर्षीही थाटले आहे बैल पोळा सण तीन दिवसांवर आला आहे मात्र खरेदीसाठी अद्याप म्हणावा तसा शेतकऱ्यांचा प्रतिसाद नसल्याने बाजारपेठेत अद्याप शुकशुकाट जाणवत आहे.

या बद्दल माहिती देताना दुकानदार शरद तिवाटणे यांनी सांगितले की,या वर्षी पाच ते दहा टक्के प्रत्येक मालकांवर दरवाढ झाली आहे.तरीही शेतकऱ्यांना बैलं पोळा सण साजरा करावा लागतो.आपल्या दारातील बैलजोड्या,गायी,म्हशी, शेळी,बोकड या जनावरांना सजविण्यासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी दरवर्षी शेतकरी सर्व अडचणी दूर सारून बैल पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करत असतात बैल पोळा सणासाठी खरेदी करण्यासाठी उद्यापासून ग्राहक येतील.अशी माहिती दिली.वर्षभर शेतकरी आपल्या शेतात बैलांकडून शेतीची सर्व कामे करून घेत असतो मात्र बैल पोळा या सणाच्या दिवशी बैलांना संपूर्ण विश्रांती दिली जाते.बैल धुऊन त्यांना सजवले जाते.शिंगे तासून बेगडाने रंगवली जातात.बैलांना गळ्यात घुंगराच्या चंगाळी गंडे म्होरक्या नवीन रंगीबेरंगी दावे पायात रंगीत गोंडे खरेदी केले जातात.हौशी शेतकरी आपल्या बैलांना सजवण्यासाठी रंगीबेरंगी झुली घेत असतात.झुल खरेदीसाठी अपवादात्मक ग्राहक येतात.

शरद तिवाटणे यांचे दुकानात पूर्व भागातील बोरगाव, माळखांबी, मिरे, नेवरे, महाळुंग उंबरे तसेच पंढरपूर तालुक्यातील करोळे, पेहे, नांदोरे व खेड्यापाड्यातील वस्त्या वाड्यातील शेतकरी बैलपोळा सणाचे साहित्य खरेदी करण्यासाठी येत असतात श्रीपूरमध्ये आणखी काही दुकाने थाटली जातात परंतु सर्वात जुने व सर्व साहित्य खात्रीने मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणून तिवाटणे यांच्या दुकानाला पसंती दिली जाते. सध्या यांत्रिक पद्धतीने शेती करण्याचा कल वाढला आहे. ट्रॅक्टर लहान यांत्रिक औजारे यांच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करण्याचा कल वाढला आहे. त्यामुळे बैलगाडी बैलजोड्या यांची संख्या कमी होत आहे.त्यामुळे जुने शेतकरी खानदानी बागायतदार वगळता अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेतीसाठी बैल संभाळणे त्यांचेकडून शेती करुन घेणे परवडत नसल्याची वस्तुस्थिती आहे.आजही खेड्यातील अनेक भागात बैलजोड्या, गायी, म्हशी यांच्या भव्य मिरवणुका पारंपरिक वाद्यांच्या गजरात काढल्या जातात. काही भागात बैलपोळा मिरवणुकीत संगीत बारीतील बायका नाचवून आनंद साजरा केला जातो. गावांतील पारंपरिक वाद्य हलगी, सनई, ढोल, ताशा लेझीम पथक बँड लावले जाते.

# खुनाच्या आरोपातील आरोपीचा न्यायालयात इच्छामृत्यूसाठी अर्ज!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सासऱ्याच्या खुनाच्या आरोपावरून गेल्या १६ महिन्यांपासून कारागृहात असलेल्या मंगेश देविदास सलगर (रा. कोळेगाव, ता. मोहोळ) याने इच्छामृत्यू मिळावा तसेच मृत्यूनंतर आपले अवयव दान करण्याची परवानगी मिळावी, यासाठी सोलापूर सत्र न्यायालयात लेखी अर्ज केला. या अनोख्या अर्जामुळे न्यायालयीन वतुर्ळातही चर्चेला उधाण आले.

राम हिंगणी (ता. मोहोळ) येथे २८ एप्रिल २०२५ रोजी मध्यरात्री पती-पत्नीच्या वादातून ही घटना घडल्याचा पोलिसांचा आरोप आहे. आरोपी मंगेश सलगर याने चाकूने सासरे बापूराव तुळशीराम माशाळ यांच्यावर हल्ला करून त्यांचा खून केला, तर सासू आशा बापूराव माशाळ आणि मेव्हणा अभिषेक बापूराव माशाळ यांना गंभीर जखमी केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी मोहोळ पोलिसांनी २८ एप्रिल २०२५ रोजी सलगरला अटक केली असून, त्याच्याविरुद्ध न्यायालयात



दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणाची सुनावणी सोलापूर सत्र न्यायालयात सुरू आहे. आरोपी आणि त्याची पत्नी यांच्यातील कौटुंबिक वादातून मोहोळ न्यायालय, सोलापूर न्यायालय तसेच कौटुंबिक न्यायालयात दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे खटले दाखल असल्याचे अजार्तील माहितीत नमूद करण्यात आले आहे.

१९ ऑगस्ट २०२६ रोजी सत्र न्यायालयात खटल्याच्या सुनावणीदरम्यान आरोपीने न्यायाधीशांकडे लेखी अर्ज सादर केला. गेल्या १६ महिन्यांपासून कारागृहात शिक्षा भोगत असून, आता कारागृहात दिवस काढण्याची आपली शारीरिक व मानसिक स्थिती राहिलेली नाही, असे त्याने अर्जात म्हटले आहे.

'मी पूर्णपणे खचलो आहे. उलट काहीतरी चांगले काम माझ्याकडून व्हावे, अशी आशा आहे. मला इच्छामृत्यू घ्यावा व माझे सर्व अवयव दान करण्यात यावेत, जेणेकरून अनेकांना जीवदान मिळेल,' अशी मागणी आरोपीने केली. तसेच आपली न्यायाची मागणी मान्य होईपर्यंत आमरण उपोषण करण्याची परवानगी द्यावी आणि उपोषणादरम्यान अन्य कैद्यांकडून मानसिक त्रास, शिवीगाळ किंवा मारहाण होऊ नये यासाठी सुरक्षा द्यावी, अशीही विनंती त्याने केली.

आरोपीच्या अर्जावर न्यायालयाने सरकारी वकील तसेच कारागृह अधिकाऱ्यांचे म्हणणे मागवले. सुनावणीदरम्यान आरोपीच्या वकिलांचा आणि सरकारी पक्षाचा युक्तिवाद ऐकल्यानंतर इच्छामृत्यू व अवयवदानासंदभार्तील आरोपीची विनंती आणि त्याच्यावरील खुनाचा खटला या दोन स्वतंत्र बाबी आहेत, असे मत न्यायालयाने व्यक्त केले.

त्यानंतर आरोपीचा अर्ज दप्तरी दाखल करून निकाली काढण्यात आला. तसेच आरोपीचे समुपदेशन करण्याचे आणि गरज भासल्यास त्याला वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याचे आदेश जेल अधीक्षकांना देण्यात आले.

या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. धनंजय माने व ॲड. जयदीप माने, तर सरकार पक्षातर्फे ॲड. पी. ए. जन्नु यांनी काम पाहिले.

दरम्यान, खुनाच्या आरोपाखाली कारागृहात असलेल्या आरोपीने इच्छामृत्यू, देहदान आणि अवयवदानासाठी न्यायालयात अर्ज केल्याची ही न्यायालयीन इतिहासातील पहिलीच घटना असल्याचा दावा करण्यात आला आहे.

# माळशिरस विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत २५४, माळशिरस (अ.जा.) विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदारांनी प्रारूप यादीमध्ये आपले नाव, पत्ता, वय, लिंग, मतदार ओळखपत्र क्रमांक (EPIC) तसेच मतदान केंद्राची माहिती तपासून घेण्याचे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, माळशिरस विभाग अकलूज यांनी केले आहे.

प्रारूप मतदार यादीमध्ये नाव, पत्ता किंवा अन्य तपशिलात काही त्रुटी आढळल्यास अथवा नाव समाविष्ट नसल्यास ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत दावे व हरकती नोंदविता येणार आहेत. प्राप्त दावे व हरकतींवर ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सुनावणी व निर्णयाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

मतदार यादीत नवीन नाव नोंदविण्यासाठी नमुना क्र. ६ (Form-6) भरता येणार आहे. तसेच १ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांनाही नवीन मतदार नोंदणीसाठी अर्ज करता येणार आहे.

मतदार यादीतील मृत किंवा स्थलांतरित व्यक्तींचे नाव वगळणे अथवा नावाबाबत हरकत नोंदविण्यासाठी नमुना क्र. ७ (Form-7) वापरता येईल. तर नाव, जन्मतारीख, वय, लिंग, नातेसंबंधाचा पत्ता, दिव्यांगत्वाची नोंद किंवा नवीन ई-EPIC यासह अन्य दुरुस्तीसाठी नमुना क्र. ८ (Form-8) भरता येणार आहे.

नमुना ६, ७ व ८ साठी नागरिकांना Voter Services Portal तसेच Voter Helpline App च्या माध्यमातून ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधाही उपलब्ध आहे. त्यामुळे मतदारांनी घरबसल्या मतदार यादीतील आपली माहिती तपासून आवश्यक त्या दुरुस्ती किंवा नोंदणीची कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विशेष पुनरीक्षण प्रक्रियेनंतर ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार असल्याचे प्रशासनाने कळविले आहे.

मतदारांनी आपले नाव मतदार यादीत आहे की नाही, याची खात्री करून घेऊन कोणतीही त्रुटी असल्यास विहित मुदतीत दावे अथवा हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, माळशिरस विभाग अकलूज यांनी केले आहे.

# विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले आज सोलापूर दौऱ्यावर

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगाच्या निदेर्शानुसार पुणे महसूल विभागातील पाच जिल्ह्यांसाठी विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांची 'मतदार यादी निरीक्षक' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम (SIR) 2026 अंतर्गत दावे व हरकती स्वीकारण्याच्या टप्प्यात मतदार यादी निरीक्षक शीतल तेली-उगले मंगळवार, दि. 8 सप्टेंबर रोजी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

दौऱ्यादरम्यान त्या सकाळी 6.30 वाजता पुण्याहून सोलापूरकडे प्रयाण करून शासकीय विश्रामगृह येथे येतील. सकाळी 10.45 ते 11.30 या वेळेत नवीन जिल्हाधिकारी कार्यालयात विद्यमान खासदार, आमदार तसेच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत बैठक घेण्यात येणार आहे.

यानंतर सकाळी 11.30 ते दुपारी 12 या वेळेत जुन्या जिल्हाधिकारी कार्यालयातील २४८-सोलापूर शहर उत्तर, 249-सोलापूर शहर मध्य आणि 251-सोलापूर शहर दक्षिण या मतदारसंघांच्या निवडणूक नोंदणी अधिकारी (ERO) कार्यालयांची एकत्रित पाहणी केली जाणार आहे.

दुपारी 12 ते 12.30 या वेळेत सिद्धेश्वर हायस्कूल/सोशल हायस्कूल येथे 249-सोलापूर शहर मध्य मतदारसंघातील मतदान केंद्र क्रमांक 20 ते 22 आणि 8, 17 ते 19 या केंद्रांची पाहणी केली जाणार असून, यावेळी बीएलओ तसेच मतदारांशी संवाद साधण्यात येणार आहे.

त्यानंतर दुपारी 12.30 ते 12.50 या वेळेत शरदचंद्र पवार प्रशाला/लोकमंगल प्रशाला येथे 248-सोलापूर शहर उत्तर मतदारसंघातील मतदान केंद्र क्रमांक 111 ते 133 ची पाहणी करण्यात येणार आहे.

दुपारी 12.50 ते 1.15 या वेळेत बसवेश्वर नगर/देगाव गावठाण येथे 252-सोलापूर दक्षिण मतदारसंघातील मतदान केंद्र क्रमांक 140 ते 150 ची पाहणी करून बीएलओ व मतदारांशी संवाद साधला जाणार आहे.